POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

● वर्ष-०५ ● अंक-३१८ ● मुंबई, शनिवार, २० जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

नीट पुनर्परीक्षेपूर्वी टेलिग्रामवर वरील बंदी कायम

दिल्ली उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली

■नवी दिल्ली। प्रतिनिधी,

२१ जून रोजी होणाऱ्या नीट २०२६ पुनर्परीक्षेपूर्वी पेपरफुटी रोखण्यासाठी टेलिग्रामवर २२ जूनपर्यंत घालण्यात आलेल्या तात्पुरत्या बंदीविरोधात कंपनीने दाखल केलेली याचिका दिल्ली उच्च न्यायालयाने शुक्रवारी (दि. १९) फेटाळली. लाइव्ह लॉच्या वृत्तानुसार, न्यायमूर्ती तेजस करिया यांनी निकाल देताना माहिती तंत्रज्ञान अधिनियमाच्या कलम ६९अ अंतर्गत प्लॅटफॉर्मवरील प्रवेश मर्यादित करण्यासाठी अवलंबण्यात आलेल्या प्रक्रियेबाबत समाधान व्यक्त केले. तसेच या प्रकरणातील केंद्र सरकारची कारवाई योग्य असल्याचे न्यायालयाने नमूद केले. कारवाईमागील कारणे पुरविण्यात आली नसल्याच्या आधारावर करण्यात आलेले आव्हानही न्यायालयाने फेटाळून लावले.

केंद्र सरकारला अधिकार असल्याचे न्यायालयाचे मत

न्यायालयाने स्पष्ट केले की, माहिती तंत्रज्ञान अधिनियमाच्या कलम ६९अ अंतर्गत केंद्र सरकारला एखाद्या प्लॅटफॉर्मवर बंदी घालण्याचा



अधिकार आहे. तसेच ही कारवाई प्रमाणबद्धतेच्या निकषांवरही योग्य ठरते, कारण उपलब्ध पर्यायांपैकी हा आवश्यक उपाय होता. राष्ट्रीय परीक्षा संस्था आणि शिक्षण मंत्रालयाच्या उच्च शिक्षण विभागाच्या शिफारशींनंतर टेलिग्रामविरोधातील तात्पुरता बंदी आदेश जारी करण्यात आला होता.

टेलिग्रामचा दावा

टेलिग्रामने न्यायालयात दावा केला की, नीट परीक्षेशी संबंधित बेकायदा मजकूर असलेल्या ९०० हून अधिक लिंक्स प्लॅटफॉर्मवरून हटविण्यात आल्या आहेत. तसेच बेकायदा माहितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञानाचाही वापर करण्यात येत असल्याचे कंपनीने सांगितले.

केंद्र सरकारची बाजू

दुसरीकडे, केंद्र सरकारने न्यायालयात सांगितले की, टेलिग्रामच्या तांत्रिक आणि संरचनात्मक वैशिष्ट्यांमुळे बॉट्स (स्वयंचलित संगणकीय खाती) यांच्या माध्यमातून स्वयंचलित अकाउंट्स तयार करणे आणि मोठ्या प्रमाणावर मेसेज प्रसारित करणे शक्य होते आणि त्यासाठी सतत मानवी हस्तक्षेपाची आवश्यकता नसते. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयात सांगितले की, "एकदा एखादा बॉट बंद करण्यात आला तरी तो दुसऱ्या बॉटकडे आपोआप वळवला जाऊ शकतो. त्यामुळे अशा माध्यमांतून मोठ्या प्रमाणावर माहितीचा प्रसार होण्याची शक्यता कायम राहते."

सुनावणीदरम्यान न्यायालयाची टिप्पणी

सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती तेजस करिया यांनी तोंडी निरीक्षण नोंदवत केंद्र सरकारला प्रश्न विचारला होता की,"केवळ एका गटातील नागरिक (नीट परीक्षार्थी) परीक्षा देत असल्यामुळे १५ कोटी युजर्सचे अधिकार मर्यादित केले जाऊ शकतात का?"

पावेल दुरोव्ह यांची प्रतिक्रिया

टेलिग्रामचे मुख्य कार्यकारी अधिकारी पावेल दुरोव्ह यांनीही या कारवाईवर आक्षेप घेतला होता. केंद्र सरकारच्या निर्णयामुळे पेपरफुटीसाठी जबाबदार असलेल्या व्यक्तींना नव्हे तर भारतातील १५ कोटींहून अधिक सर्वसामान्य टेलिग्राम युजर्सना शिक्षा होत असल्याचा दावा त्यांनी केला होता.

टेलिग्रामवर २२ जूनपर्यंत बंदी...
परीक्षेआधी एनटीए चा मोठा निर्णय

NEET-UG २०२६च्या फेरपरीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांची फसवणूक रोखण्यासाठी टेलिग्रामवर २२ जूनपर्यंत बंदी घातली आहेत. तसेच, ३० जूनपर्यंत मेसेज एडिट फीचरही बंद ठेवण्यात आले आहे.

NEET-UG २०२६ च्या फेरपरीक्षेआधी विद्यार्थ्यांची फसवणूक आणि पेपरफुटीच्या अफवा रोखण्यासाठी NTA आणि केंद्र सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. २१ जून रोजी होणाऱ्या परीक्षेच्या पार्श्वभूमीवर टेलिग्रामवर २२ जूनपर्यंत बंदी घातली आहे. तसेच ३० जूनपर्यंत मेसेज एडिट करण्याची सुविधाही बंद ठेवण्यात आली आहे.

टेलिग्रामवर निर्बंध का?

NTA च्या म्हणण्यानुसार, गेल्या काही दिवसांत टेलिग्रामवरील अनेक चॅनेल्स आणि ग्रुप्समध्ये 'NEET पेपर मिळवून देण्याचे' खोटे दावे केले जात होते. 'PAPER LEAKED NEET', 'Re-NEET 2026', 'Private Mafia' अशा नावांनी चालणाऱ्या चॅनेल्सवर विद्यार्थ्यांना आणि पालकांना पैसे उकळण्याचे प्रकार समोर आले होते. NTA ने स्पष्ट केले की, परीक्षा होण्यापूर्वी कोणत्याही व्यक्ती किंवा प्लॅटफॉर्मकडे प्रश्नपत्रिका उपलब्ध नसते. अशा सर्व दाव्यांवर विश्वास ठेवू नये.

पोलिस आणि सायबर यंत्रणांची कारवाई

गृह मंत्रालयाच्या इंडियन सायबर क्राईम को-ऑर्डिनेशन सेंटरने विविध राज्यांच्या पोलिसांसोबत मिळून अनेक टेलिग्राम चॅनेल्स आणि बॉट्सवर कारवाई केली आहे. बिहार, गुजरात, राजस्थानसह अनेक राज्यांमध्ये फसवणूक करणाऱ्या टोळ्यांवर छापे टाकण्यात आले आहेत.

मेसेज एडिट सुविधा का बंद?

काही लोक जुने मेसेज एडिट करून त्यात पेपर किंवा उत्तरतालिका टाकून खोटा आभास निर्माण करत होते. हे रोखण्यासाठी ३० जूनपर्यंत मेसेज एडिट सुविधा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

ठळअ चे विद्यार्थ्यांना आवाहन

NTA ने विद्यार्थ्यांना आणि पालकांना आवाहन केले आहे की, कोणत्याही प्रकारच्या अफवा किंवा पेपर मिळवून देण्याच्या दाव्यांपासून दूर राहावे. फसवणूक आढळल्यास राष्ट्रीय सायबर गुन्हे हेल्पलाइन १९३० वर तक्रार करावी.विद्यार्थ्यांनी आता फक्त अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे, परीक्षेची सुरक्षा पूर्णपणे अबाधित असल्याचे NTA ने सांगितले आहे.

पावसाचा मुहूर्त आता २२ जून

मान्सूनच्या आगमनाची प्रतीक्षा मुंबईकरांना आणखी काही दिवस करावी लागणार आहे. प्रतिकूल वातावरणीय परिस्थितीमुळे महाराष्ट्रातील मान्सूनची प्रगती थांबली आहे.



■मुंबई। प्रतिनिधी,

मान्सूनच्या आगमनाची प्रतीक्षा मुंबईकरांना आणखी काही दिवस करावी लागणार आहे. प्रतिकूल वातावरणीय परिस्थितीमुळे महाराष्ट्रातील मान्सूनची प्रगती थांबली आहे. दरम्यान, २२ जूननंतर वातावरण अनुकूल असून पाऊस पडण्याची शक्यता आहे, असे कुलाबा हवामान विभागाच्या अधिकारी सुषमा नायर यांनी सांगितले. दरम्यान, ३० जूनपर्यंत पावसाचा अंदाज घेऊन १० टक्के पाणी कपातीत वाढ करण्याची तयारी पालिका प्रशासनाने केली आहे.

८ जून रोजी पावसाने दक्षिण कोकण आणि लगतच्या दक्षिण मध्य महाराष्ट्रातील काही भागात प्रवेश केला होता. मात्र त्यानंतर त्याची प्रगती मंदावली आहे. मुंबईत मान्सून दाखल होण्याची सरासरी तारीख ११ जून असली तरी यंदा त्यात विलंब झाला आहे. अरबी समुद्रातून येणाऱ्या वाऱ्यांची गती मंदावल्याने महाराष्ट्र किनारपट्टी आणि अंतर्गत भागात आर्द्रतेचा कमी झाली आहे. अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात कमी दाबाची प्रणाली निर्माण न होणे आणि मॅडन-ज्युलियन ऑसिलेशन (एमजेओ) निष्क्रिय असणे ही मान्सूनच्या विलंबा मागील प्रमुख कारणे आहेत.



पुण्यात अन्न-औषध प्रशासन आणि अँटी नार्कोटिक्स सेल यांनी संयुक्त कारवाई केली आहे. दोन्ही विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकत्रितपणे धाड टाकली. यावेळी ट्रामाडोलयुक्त औषधांच्या बेकायदेशीर विक्री सुरु असल्याचं स्पष्ट झालं. या कारवाईत ट्रामाडोलयुक्त SPAS-TRASCEN-PLUS औषधाच्या 10,492 कॅप्सूल्स जप्त करण्यात आल्या आहेत. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. यासोबतच बंडगार्डन पोलीस ठाण्यात NDPS कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुण्यात शक्तिशाली वेदनाशामक औषधांचा बेकायदेशीर व्यापार
एफडीए आणि एएनसीची संयुक्त धाड, दोघे गजाआड

अमली पदार्थांच्या गैरवापराला आळा घालण्यासाठी आणि औषधांच्या बेकायदेशीर विक्रीविरुद्ध कठोर भूमिका घेत अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आणि पुणे गुन्हे शाखा अँटी नार्कोटिक्स सेल-१ यांच्या संयुक्त पथकाने पुण्यात मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत ट्रामाडोलयुक्त औषधांची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या दोघांना अटक करण्यात आली आहे. तसेच मोठ्या प्रमाणात औषधसाठा जप्त करण्यात आला आहे. अँटी नार्कोटिक्स सेल-१ यांना प्राप्त झालेल्या गोपनीय माहितीनुसार, मुकेश भुराराम सिरवी (वय २८ वर्षे) हा कोणताही वैध औषध विक्री परवाना नसताना SPAS-TRASCEN-PLUS या ट्रामाडोलयुक्त औषधाची बेकायदेशीर विक्री करीत असल्याचे निदर्शनास आले. सदर माहितीची पडताळणी करून अन्न व औषध प्रशासन आणि अँटी नार्कोटिक्स सेलच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तरीत्या कारवाईचे नियोजन केले. औषध निरीक्षक, अन्न व औषध प्रशासन, पुणे विभाग तसेच अँटी नार्कोटिक्स सेल-१ यांच्या संयुक्त पथकाने ताडीवाला रोड परिसरातील संबंधित ठिकाणी छापा टाकला. तपासणीदरम्यान SPAS-TRASCEN-PLUS (Dicyclomine Hydrochloride, Tramadol Hydrochloride आणि Acetaminophen Capsules) या औषधांचा मोठा साठा आढळून आला. या कारवाईत एकूण ७३ बॉक्सेसमधील १०,४९२ कॅप्सूल्स जप्त करण्यात आल्या. जप्त औषधांची अंदाजे किंमत ६८,३२८ रुपये इतकी आहे. त्यामध्ये ४२४.०६ ग्रॅम ट्रामाडोल आढळून आले. हे प्रमाण अमली पदार्थ आणि मन:प्रभावी पदार्थ अधिनियम अंतर्गत निर्धारित श्व्यावसायिक प्रमाणश्र श्रेणीत मोडत असल्याने या प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले आहे. ट्रामाडोल हे एक शक्तिशाली वेदनाशामक औषध असून त्याचा वैद्यकीय सल्ल्याशिवाय अथवा गैरवापरासाठी वापर केल्यास व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. अशा औषधांचा बेकायदेशीर व्यापार युवकांमध्ये व्यसनाधीनता वाढविणारा असून सार्वजनिक आरोग्यासाठी गंभीर धोका निर्माण करणारा आहे. तपासादरम्यान सदर औषधांचा पुरवठा निलेश मोघे यांच्यामार्फत होत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिसांनी मुकेश भुराराम सिरवी आणि निलेश मोघे या दोघांना अटक केली आहे. तसेच संबंधित पुरवठा साखळीतील इतर व्यक्तींच्या भूमिकेचाही तपास सुरू असून संपूर्ण वितरण व्यवस्थेचा शोध घेण्यात येत आहे. या प्रकरणी बंडगार्डन पोलीस ठाण्यात अमली पदार्थ आणि मन:प्रभावी पदार्थ अधिनियमांतर्गत कलम ८(क), २२(क) आणि २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास अन्न व औषध प्रशासन आणि अँटी नार्कोटिक्स सेल यांच्या समन्वयाने सुरू आहे. श्रामाडोलसारख्या औषधांचा गैरवापर युवकांमध्ये व्यसनाधीनता वाढविणारा असून सार्वजनिक आरोग्यासाठी गंभीर धोका निर्माण करतो. या बेकायदेशीर पुरवठा साखळीतील प्रत्येक घटकाविरुद्ध कठोर कारवाई केली जाईलश्र, अशी प्रतिक्रिया अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिली आहे.

अळ्या, कॉकरोच अन्... मेसला टाळं
विद्यार्थ्यांच्या तक्रारी वाचून तुकाराम मुंढेंची धडक कारवाई

तुकाराम मुंढेंनी सोशल मीडियावरुन मिळालेल्या तक्रारी वाचून थेट पुण्यातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून कारवाईचे आदेश दिले.



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक,

अन्न व औषध प्रशासनाने पुण्यातील सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या मध्यवर्ती भोजनगृहाचा म्हणजेच सेंट्रल कॅन्टीनचा अन्न परवाना पुढील आदेशापर्यंत निलंबित केला आहे. ही कारवाई एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आदेश दिल्यानंतर करण्यात आली आहे.

अनेक गंभीर त्रुटी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मध्यवर्ती भोजनगृह चालवणाऱ्या 'मे. श्री स्वामी समर्थ भोजनालय अँड केटरिंग सर्विसेस'चा अन्न परवाना अन्न व औषध प्रशासनाने निलंबित केला. अन्नसुरक्षेशी संबंधित गंभीर त्रुटी आढळून आल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या निदेर्शाने ही कारवाई करताना भोजनगृहाची तपासणी करण्यात आली. अन्नसुरक्षा अधिकाऱ्यांनी 16 जूनला तपासणी केली असताना त्यांना अनेक गंभीर त्रुटी आढळून आल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या अन्नसुरक्षतेस बाधा निर्माण होण्याची शक्यता असल्याने अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे.

16 जूनच्या तपासणीत नेमकं काय आढळून आलं ?

कच्च्या आणि शिजवलेल्या अन्नाचा वेगळा साठा न केल्याचं अधिकाऱ्यांना तपासादरम्यान दिसून आलं. तसेच स्वयंपाक केला जातो त्या ठिकाणी तापमान नियंत्रण नसल्याचंही दिसून आलं. ज्या ठिकाणी अन्न शिजवलं जातं तिथे बऱ्याच काळापासून कीड-कीटक नियंत्रणासंदर्भातील नियोजन म्हणजेच पेस्ट कंट्रोल करण्यात आलं नसल्याचं दिसून आलं आहे. मेसमधील किचनमध्ये स्वच्छतेचा आभाव असल्याचं दिसून आलं आहे. त्याचप्रमाणे मेस चालकाकडे पाण्याच्या गुणवत्तेचे आणि कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय तपासणीचे रेकॉर्ड नसल्याचं दिसून आलं आहे. एकूण पाच समस्या या ठिकाणी दिसून आल्याने परवाना रद्द करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या तक्रारीच्या आधारे कारवाई

विद्यार्थ्यांकडून मेसच्या अन्नपदार्थामध्ये अळी, कीड, माश्या आढळल्याच्या तक्रारी मिळाल्या होत्या. मेस-कॅन्टीनमधील अन्नाच्या गुणवत्तेबाबत विद्यार्थ्यांकडून गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने तक्रारी येत होत्या. अन्नपदार्थामध्ये अळी, कॉकरोच सापडण्याबरोबरच येथील अस्वच्छतेसंदभार्तील तक्रारींमुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजी होती. विद्यापीठ प्रशासन आणि विद्यार्थ्यांसाठी ही मोठी अडचणीची गोष्ट ठरत होती. दररोज मोठ्या संख्येने विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी येथे जेवण घेत असल्याने यासंदर्भात अनेकदा तक्रारी करण्यात आल्या होत्या. अखेर सोशल मीडियावरील तक्रारींनंतर या ठिकाणी तपासणी करण्याचे आदेश तुकाराम मुंढेंनी दिले होते. त्यानुसार 16 जून रोजी या ठिकाणी अचानक एफडीएच्या अधिकाऱ्यांनी धाड टाकून तपासणी केली.

सध्या पर्याय शोधण्याची विद्यार्थ्यांवर वेळ

मेस कंत्राटदाराचा परवाना निलंबित करण्यात आल्याने भोजनगृह सध्या बंद आहे. आवश्यक सुधारणा करून पुन्हा तपासणी झाल्यानंतरच ही मेस पुन्हा सुरू होऊ शकते. सर्व 8 हॉस्टेल मेस आणि सेंट्रल रिफेक्टरीची सेवा तात्पुरती बंद करण्यात आली आहे. विद्यार्थी सध्या जेवणारी पयार्यी व्यवस्था करत असल्याचं वृत्त समोर आलं आहे.

तुकाराम मुंढेंची भीती... विरारमधील धक्कादायक प्रकार
बुरशी लागलेले नूडल्स रस्त्यावर फेकले

अन्न व औषध पुरवठा विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी कारवायांचा धडाका राज्यभरात लावला आहे. ज्यामुळं आता त्यांच्या धाडसत्रांची भीतीसुद्धा भेसळखोरांमध्ये पाहायला मिळत आहे.



■विरार। प्रतिनिधी,

महाराष्ट्रात मागील काही दिवसांपासून एक असं धाडसत्र सुरू आहे, ज्यामध्ये अन्नपदार्थ आणि औषधांमध्ये केली जाणारी भेसळ आणि तत्सम घटना अतिशय गंभीररित्या उघडकीस आल्या आहेत. अशा या धासत्राची धुरा अन्न व औषध पुरवठा विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या खांद्यांवर असून, त्यांच्या धडक कारवाईनं सध्या अनेकांना हैराण केलं आहे. भेसळखोरांमध्ये सध्या मुंढेंच्या कारवाईची प्रचंड भीती पाहायला मिळत असून, या भीतीपोटी आता अनेक हॉटेल चालक आणि दुकानदारांमध्ये खळबळ उडाली आहे. राज्याच्या बहुतांश भागांमध्ये हेच चिन्हं पाहायला मिळालं. विरारसुद्धा इथं अपवाद ठरलं नाही. अन्न आणि औषध प्रशासनाच्या कारवाईच्या भीतीने विरार पश्चिमेच्या आगाशी परिसरात मुदत संपलेले लोणी अर्थात एक्स्पायर्ड बटर आणि बुरशी लागलेले नूडल्स रस्त्यावर फेकून देण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. डिसेंबर 2025 ही मुदत/ तारीख असलेली ही सर्व पाकिटं होती. अलीकडेच अन्न व औषध प्रशासनाने वसई-विरार परिसरातील विविध हॉटेल्स, गोदामं आणि दुकानदारांवर धाडी टाकून ही कारवाई केली. त्यामुळे अनेक व्यापाऱ्यांचे धाबे दणाणले असून कारवाई टाळण्यासाठीच हा सारा साठा गुपचूप रस्त्यावर फेकण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मुख्य म्हणजे स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार रस्त्यावर फेकून देण्यात आलेले हे खाद्यपदार्थ गायी, म्हशी, कुत्रे, पक्षी व इतर भटक्या प्राण्यांनी खाल्ल्यास त्यांनाही विषबाधा होऊन त्यांच्या जीवालाही धोका उद्भवू शकतो. यामुळे सार्वजनिक आरोग्यासह पर्यावरणालाही गंभीर धोका निर्माण झाला आहे असा सूर आळवला जात आहे.

जळगावमध्ये फेकली औषधं...

विरारच नव्हे तिथं जळगावच्या जामनेर तालुक्यातील तोंडापूर परिसरात उघड्यावर मोठ्या प्रमाणावर विषारी रसायन फेकून दिल्याचा प्रकार समोर आला. विषारी रसायनांमुळे जमीन, पाणी व पर्यावरण प्रदूषित झाल्याने याप्रकरणी पहूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला. विषारी रसायने जमिनीत व जलसाठ्यात मिसळल्याने परिसरातील पाणी व वातावरण दूषित झाला असून मानवी आरोग्यास धोका निर्माण झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. मंडळ अधिकारी यांच्या तक्रारीवरून तोंडापूर येथील शेख हसन शेख सांडू यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तुकाराम मुंढे यांच्या कारवाईच्या भीतीने विषारी रसायन उघड्यावर फेकून दिल्याची परिसरात चर्चा आहे.

मिरारोडमध्ये गोवंश हत्या प्रकरणी गुन्हा दाखल

■भाईंदर। प्रतिनिधी,

मिरारोड येथील बेव्हर्ली पार्क परिसरात गोवंश असलेल्या दोन मोठ्या जनावरांची निर्घृण हत्या करून त्यांच्या मांसाची बेकायदेशीर वाहतूक केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी मिरारोड पोलीस ठाण्यात ५ अज्ञात व्यक्तींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत. तर अंधाराचा फायदा घेऊन सदरील नराधमांनी मोकळ्या जागेत आणून गायी कापून हत्या केली आहे. मिरारोड पूर्व येथील बेव्हर्ली पार्क भागात असलेल्या मिरा-भाईंदर महापालिकेच्या मोकळ्या जागेत ५ अज्ञात इसमांनी संगनमत करून दोन मोठ्या गोवंश जनावरांना ताब्यात घेतले. त्यापैकी एका पांढऱ्या रंगाच्या जनावराला अत्यंत क्रूरतेने वागवून त्याची निर्दयीपणे कत्तल करण्यात आली. कत्तल केल्यानंतर आरोपींनी पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृत जनावरांच्या अवशेषांची विल्हेवाट लावली. तसेच, या गोवंश जनावरांचे मांस एका कारमध्ये भरून तेथून पळवून नेले. ही घटना १३ जून रोजी पहाटे ३ ते ४ च्या सुमारास घडली. या प्रकरणी त्या परिसरात राहणाऱ्या एका इसमाने मिरारोड पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून महाराष्ट्र छळ प्रतिबंधक अधिनियम, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम विविध कलम आणि महाराष्ट्र पशू संरक्षण अधिनियमाचे विविध कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय जाधव हे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

पत्नीवर नजर ठेवण्यासाठी डॉक्टर पतीने संपूर्ण घरभर लावले सीसीटीव्ही कॅमेरे... तिने असं काही केलं की अख्खं कुटुंब हादरलं



■अंबरनाथ। प्रतिनिधी,

अंबरनाथमध्ये एका 26 वर्षीय नवविवाहितेने लग्नानंतर अवघ्या दीड महिन्यात हुंड्यासाठीच्या छळाला कंटाळून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हा दाखल करत या नवविवाहितेच्या डॉक्टर पतीला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. विशाखा टिळेकर असं या मृत नवविवाहितेचं नाव होतं. विशाखा डॉक्टर पतीसह अंबरनाथ येथे वास्तव्यास होती. शेजारच्या महिलेशी गप्पा मारल्याने सासरच्यांनी तिला मारहाण केली होती. पण हा छळ फक्त शारिरीक मारहाणीपुरता नव्हता असं तिच्या कुटुंबीयांचं म्हणणं आहे.

पतीने पत्नीच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी घरात आणि घराबाहेर सीसीटीव्ही कॅमेरे बसवले होते. तिच्या गोपनीयतेवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला जात होता. शेजाऱ्यांशी बोलल्यास मारहाण करणे, तसंच माहेरून पैसे आणि दागिने आणण्यासाठी दबाव टाकणं, असे गंभीर आरोप मृत विवाहितेच्या कुटुंबीयांनी केले आहेत.

विशाखाचं अंबरनाथमधील डॉ. नितीन टिळेकर याच्यासोबत 30 एप्रिल 2026 रोजी तिचं लग्न झालं होतं. लग्नापूर्वी सगळं सुरळीत होतं, मात्र लग्नानंतर विशाखाला हुंड्यासाठी मानसिक आणि शारीरिक त्रास देण्यास सुरुवात झाली. लग्नात अपेक्षेप्रमाणे मानपान मिळाला नाही, माहेरून पैसे आणि दागिने आणले नाहीत, यासाठी तिचा सतत मानसिक आणि शारीरिक छळ सुरू होता.

इतकंच नव्हे, तर पत्नी दिवसभर काय करते, कोणाशी बोलते आणि कुठे जाते यावर लक्ष ठेवण्यासाठी पती डॉ. नितीन टिळेकर याने घरात आणि घराबाहेर सीसीटीव्ही कॅमेरे बसवले होते. विशाखाला तिच्या माहेरच्यांशी बोलण्यास सुद्धा मज्जाव करण्यात आला होता. दोन दिवसांपूर्वी शेजारच्या महिलेशी बोलल्याच्या कारणावरून विशाखाला पतीने मारहाण केली होती. आत्महत्या करण्यापूर्वी तिने आपल्यावर होत असलेल्या त्रासाबाबत आईला माहिती दिली होती. यानंतर आई-वडील तिला माहेरी घेऊन जाण्याची तयारी करत असतानाच विशाखाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी आत्महत्येस प्रवृत्त करणे, हुंड्यासाठी छळ करणे यासह इतर कलमांनुसार पती डॉ. नितीन टिळेकर याच्यासह सासरच्यांवर गुन्हा दाखल केला असून नितीन टिळेकर याला बेड्या ठोकल्या आहेत.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

रेव्ह पार्टीचे जाळे



‘विद्येचे माहेरघर’ आणि ‘महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी’ अशी ओळख असलेले पुणे शहर तुळापूर येथे झालेल्या रेव्ह पार्टीच्या निमित्ताने पुन्हा एकदा चर्चेत आले. शहराच्या वर्दळीपासून दूर, निसर्गरम्य आणि निर्जन ठिकाणी रात्रीच्या वेळी रंगणाऱ्या अशा रेव्ह पार्ट्यांचे वाढते प्रमाण चिंतेचा विषय ठरत आहे. या प्रकारांमुळे पुण्याच्या सांस्कृतिक वैभवाला तडा जाण्याची भीती व्यक्त होत असून, तरुणाईवर होणाऱ्या परिणामांबाबतही प्रश्न उपस्थित होत आहे.

पुणे हे शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. देशभरातील लाखो विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी येथे येतात. आधुनिक जीवनशैली, माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील वाढत्या रोजगाराच्या संधी आणि तरुणांच्या वाढत्या आर्थिक क्षमतेमुळे उच्चभ्रू मनोरंजनाच्या विविध प्रकारांना मागणी वाढत आहे. या पार्श्वभूमीवर काही आयोजकांकडून फार्महाऊस, रिसॉर्ट्स किंवा शहराबाहेरील दुर्गम ठिकाणी रेव्ह पार्टीचे आयोजन केले जात असल्याचे विविध घटनांमधून समोर आले आहे. अशा कार्यक्रमांचे आयोजन प्रामुख्याने सोशल मीडियाच्या माध्यमातून गुप्तपणे केले जाते. निमंत्रणे केवळ निवडक व्यक्तींनाच दिली जातात आणि अनेक ठिकाणी प्रवेशासाठी शुल्कही आकारले जाते. त्यामुळे अशा कार्यक्रमांची माहिती मिळवणे, त्यांचा माग काढणे आणि त्यांच्यावर प्रभावी नियंत्रण ठेवणे हे प्रशासनासमोरचे एक गंभीर आणि आव्हानात्मक कार्य बनले आहे. ‘रेव्ह पार्टी’ ही केवळ मनोरंजनाची साधी पद्धत नसून, तरुणाईला विनाशाच्या दिशेने नेणारा एक छुपा सापळा ठरू शकते. या संस्कृतीचे तरुणांवर होणारे परिणाम गंभीर आणि दीर्घकालीन असतात. अशा पार्ट्यांमध्ये अनेकदा कोकेन, एमडीएमए (एक्स्टसी) यांसारख्या सिंथेटिक अमली पदार्थांचा वापर केला जातो. हे पदार्थ मेंदूच्या मज्जासंस्थेवर प्रतिकूल परिणाम करतात. त्यांच्या सेवनामुळे काही काळासाठी बेधुंद आनंदाची अनुभूती मिळत असली, तरी त्यानंतर नैराश्य, मानसिक अस्थिरता, स्मरणशक्ती कमी होणे आणि इतर मानसिक विकार उद्भवू शकतात. अमली पदार्थांच्या अतिसेवनामुळे अनेक तरुणांचा मृत्यू झाल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. पुणे हे शिक्षणाचे केंद्र असल्याने देशभरातून तरुण येथे येतात. मात्र काही जण क्षणिक आनंदाच्या मोहात पडून अभ्यास, करिअर आणि विकासाकडे दुर्लक्ष करतात. अमली पदार्थ, दारू किंवा हुक्क्याला ‘कूल’ समजणे हा चुकीचा समज आहे. अशा पार्ट्या गुप्त नेटवर्कद्वारे आयोजित केल्या जातात आणि त्यातून कायदेशीर, मानसिक व आर्थिक समस्या निर्माण होऊ शकतात. व्यसनामुळे काही तरुण गुन्हेगारीकडे वळण्याची शक्यता असते. त्यामुळे पालक, शैक्षणिक संस्था आणि समाजाने एकत्र येऊन तरुणांमध्ये जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. पुण्यात रेव्ह पार्ट्यांचा इतिहास नवा नाही. यापूर्वी डोणजे, खराडी, लोणावळा, पिरंगुट आणि मुळशी परिसरातही अशा प्रकारच्या पार्ट्यांवर पोलिसांनी कारवाई केली आहे. गेल्या दोन दशकांमध्ये पुण्याच्या ग्रामीण तसेच शहरी भागात वेळोवेळी हाय-प्रोफाइल रेव्ह पार्ट्या उघडकीस आल्या असून, त्यांच्यावर पोलिसांनी कठोर कारवाई केली आहे. पुण्याच्या इतिहासातील सर्वात मोठी आणि खळबळजनक रेव्ह पार्टी सिंहगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या डोणजे गावातील आंब्याच्या बागेत झाली होती. या कारवाईदरम्यान एका मोठ्या आंतरराष्ट्रीय ड्रग रॅकेटचा पर्दाफाश करण्यात आला होता. रेव्ह पार्टी संस्कृतीकडे केवळ मनोरंजन म्हणून न पाहता, त्यातील संभाव्य धोके ओळखणे आणि तरुणांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे अशा पार्ट्यांना ‘ग्लॅमरस’ स्वरूप प्राप्त झाले आहे. चित्रपट, वेबसिरीज आणि ऑनलाइन माध्यमांमधून दाखवली जाणारी जीवनशैली अनेक तरुणांना आकर्षित करते. त्यामुळे काही वेळा वास्तव आणि आभासी जगातील फरक समजून घेण्यात युवक गोंधळतात. क्षणिक आनंद, प्रसिद्धी आणि सामाजिक प्रतिष्ठेच्या अपेक्षेत काही जण धोकादायक प्रवृत्तींकडे वळू शकतात. रेव्ह पार्ट्यांमध्ये सहभागी होणारे सर्वच तरुण चुकीच्या मार्गावर जातात असे नाही. अनेक जण केवळ मनोरंजनाच्या उद्देशाने अशा कार्यक्रमांना उपस्थित राहतात. मात्र अशा ठिकाणी अमली पदार्थांचा वापर, बेकायदेशीर कृत्ये किंवा असुरक्षित वर्तन यांचा धोका अधिक असतो. त्यामुळे युवकांनी अशा वातावरणातील संभाव्य परिणामांची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. अशा घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाने गुप्त माहिती संकलन, नियमित तपासणी, छापेमारी आणि कठोर कायदेशीर कारवाई यावर भर दिला आहे. मात्र केवळ पोलिसी कारवाई करून ही समस्या पूर्णपणे सोडवता येणार नाही. यासाठी पालक, शैक्षणिक संस्था आणि समाज यांचीही महत्त्वपूर्ण भूमिका आहे. पालकांनी मुलांशी नियमित संवाद साधणे, त्यांच्या मित्रपरिवाराची माहिती ठेवणे तसेच त्यांची मानसिक आणि भावनिक स्थिती समजून घेणे गरजेचे आहे. अनेकदा एकटेपणा, स्पर्धेचा ताण किंवा भावनिक समस्या यामुळे काही युवक चुकीच्या संगतीत अडकतात. त्यामुळे कुटुंबात विश्वासाचे आणि संवादाचे वातावरण निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्ती, मानसिक आरोग्य, कायदेशीर जागरूकता आणि जबाबदार वर्तन याबाबत जनजागृती करणे आवश्यक आहे. तसेच युवकांना क्रीडा, कला, सामाजिक कार्य आणि इतर सकारात्मक उपक्रमांकडे वळवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. एकूणच, अशा घटनांना प्रतिबंध करण्यासाठी प्रशासनाची कडक भूमिका आणि पालक व समाजाचा सक्रिय सहभाग या दोन्ही गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या आहेत. तुळापूर येथील कथित ‘प्रोजेक्ट एक्स’ रेव्ह पार्टीची घटना ही केवळ एका पोलीस कारवाईपुरती मर्यादित नसून, समाजासमोर उभे राहिलेले एक गंभीर सामाजिक आव्हान आहे. पुणे आणि परिसरात वाढत असलेल्या रेव्ह पार्टी संस्कृतीकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहणे पुरेसे ठरणार नाही. या प्रवृत्तीमागील सामाजिक, मानसिक आणि सांस्कृतिक कारणांचा सखोल विचार करणे आवश्यक आहे. तरुणाई ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे. त्यांच्या ऊर्जा, कल्पकता आणि क्षमतेला योग्य दिशा देण्यासाठी कुटुंब, शिक्षणसंस्था, समाज आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. मनोरंजन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे महत्त्व मान्य करतानाच कायद्याचे पालन, आरोग्यदायी जीवनशैली आणि सामाजिक जबाबदारी यांचे भान ठेवणे ही आजच्या काळाची गरज आहे. रेव्ह पार्टीसारख्या प्रवृत्तींकडे केवळ प्रतिबंधात्मक दृष्टीने न पाहता, तरुणांमध्ये सकारात्मक पर्याय, योग्य मार्गदर्शन आणि मूल्याधिष्ठित वातावरण निर्माण करण्यावर भर देणे आवश्यक आहे. अन्यथा अशा घटनांमुळे अनेक तरुणांचे आरोग्य, भविष्य आणि सामाजिक वाटचाल धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

यासाठीच केला होता का राम मंदिराचा अट्टाहास?



जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचा देश म्हणून बिरुद मिरवणाऱ्या भारतात अयोध्येतील राम मंदिराची निर्मिती ही काही बहुसंख्य असणाऱ्या धमीर्यांच्या जोरजबरदस्तीच्या बळावर किंवा अन्य कोणत्या गैरमार्गाने नाही तर कायदेशीर मागार्नेच झाल्याने ही बाब जगभरातील तमाम हिंदू धर्मीयांसाठी अभिमानाची आणि गौरवाची आहे. परंतु, मंदिराची निर्मिती होऊन दोन ते अडीच वर्षे होत नाहीत तोच या मंदिराच्या दानपेटीतून शेकडो कोटींचे घोटाळे झाल्याचे उघडकीस आले आहेत. तर मग यासाठीच केला होता का राम मंदिराचा अट्टाहास?

तमाम हिंदू धर्मीयांचे श्रद्धास्थान असणाया अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिराच्या दानपेटीत घोटाळा होणे आणि त्याच्या चौकशीसाठी सरकारवर विशेष तपास पथक (एसआयटी) नेमण्याची वेळ येणे, ही बाब भारतासाठी फार लाजीरवाणी असून हिंदू धर्मीयांना संपूर्ण जगात मान खाली घालायला लावण्यासारखीच आहे. हिंदूबहुल देश असूनही अयोध्येत राम मंदिराच्या निर्मितीसाठी भारताला अनेक वर्षे कसा संघर्ष करावा लागला, हे संपूर्ण जगाने पाहिले. हिंदू धर्मीय बहुसंख्य असतानाही अनेक वर्षे न्यायालयीन लढा देऊन कायदेशीर मार्गानेच अयोध्येत राम मंदिर निर्मिती करणे, ही बाब भारतासाठी आणि तमाम हिंदू धर्मीयांसाठी जगभरात अभिमानास्पद आणि कौतुकाची मानली जाते. इतर देशांमध्ये ज्या पद्धतीने बहुसंख्य असणाऱ्या धर्मीयांकडून अल्पसंख्य असणाऱ्या धर्मीयांवर अन्याय, अत्याचार केले जातात, तसे प्रकार कधी भारतात घडत नाहीत. सर्वधर्म समभावाचे पालन करणाया धर्मनिरपेक्ष भारतात अल्पसंख्याक आपल्याला येथे सर्वात सुरक्षित मानतात. हीच तर भारताची संपूर्ण जगात खरेतर जमेची बाजू आहे. यासाठी भारताचे जगभरात नेहमी कौतुक होतेच. राम मंदिराच्या निर्मितीसाठीही भारतात हिंदू धर्मीयांना कसा अनेक वर्षांपर्यंत संघर्ष करावा लागला, हे संपूर्ण जगासाठी काही नवीन नाही. न्यायालयीन प्रक्रियेमध्ये विरुद्ध पक्षकारांचीही बाजू पूर्णपणे ऐकून घेतली जाते. त्यांनाही आपले म्हणणे मांडण्याचे समान अधिकार दिले जातात. पुराव्यांच्या आधारावरच निकाल दिला जातो. न्यायालयीन प्रक्रियेस लोकशाहीमध्ये फार महत्त्व आहे. जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचा देश म्हणून बिरुद मिरवणाऱ्या भारतात राम मंदिराची निर्मिती ही काही बहुसंख्य असणाऱ्या धर्मीयांच्या जोरजबरदस्तीच्या बळावर किंवा अन्य कोणत्या गैरमार्गाने नाही तर कायदेशीर मार्गानेच झाल्याने ही बाब जगभरातील तमाम हिंदू धमीर्यांसाठी अभिमानाची आणि गौरवाची आहे. अयोध्येत राम मंदिराची निर्मिती कायदेशीर मागार्ने करून भारताने जगभरात नाव जरूर कमावले. परंतु, मंदिराची निर्मिती होऊन दोन ते अडीच वर्षे होत नाहीत तोच या अयोध्येतील प्रभू श्रीरामाच्या मंदिरातील दानपेटीत जर शेकडो कोटींचे घोटाळे होत असतील तर असे प्रकार आपल्या भारताची प्रतिमा जगभरात मलीन करत आहे, याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

या राम मंदिराच्या निर्मितीसाठी हिंदू धर्मीयांनी अनेक वर्षे कडवा संघर्ष केला. मंदिर निर्मितीची वेळ आल्यानंतर भरभरून दानही दिले. भाविकांच्या अथांग प्रेमापोटी मंदिर निर्मितीही झाली. अयोध्येतील राम मंदिराकडे राष्ट्रमंदिर म्हणून पाहण्यात येत आहे. भारताचे राष्ट्रमंदिर असणाऱ्या या मंदिराची देखरेख, व्यवस्थापन अशा पद्धतीने व्हायला हवे होते की, संपूर्ण जगाला याचा हेवा वाटेल. संपूर्ण जगात आदर्श ठरेल, असे व्यवस्थापन राम मंदिरासाठी करणे गरजेचे होते. परंतु, आज आपले दुर्दैव हे की, जगात आदर्श ठरणारे व्यवस्थापन सोडा येथे प्रभू श्रीरामाची दानपेटीही काही सुरक्षित राहिलेली नाही. नवा आदर्श निर्माण करता आला नसला तरी जे काही वलय आहे किमान ते तरी टिकवून ठेवण्याचे औदार्य दाखवणे गरजेचे होते. परंतु, हेदेखील काही जमलेले नाही. येथील काही समाजकंटकांनी थेट राम मंदिराच्या दानपेटीतून रक्कम चोरून आतापर्यंत कोट्यवधींचा घोटाळा केल्याचे खळबळजनक आरोप होत आहेत. या घोटाळ्याची व्याप्ती २०० ते १४०० कोटींच्या घोटाळ्यापर्यंत असल्याचे आरोप होत आहेत. नेमका किती कोटींचा घोटाळा आहे, याचा काही आकडा आतापर्यंत समोर आलेला नाही. मात्र, हा प्रकार नेमका कधीपासून सुरू आहे, हेदेखील समोर आलेले नाही. तसेच, यामागे नेमका कोणाचा हात आहे, याचाही काही छडा लागलेला नाही.

या सर्व प्रकाराबाबत मंदिराच्या ट्रस्टच्या वतीने आक्षेप घेण्यात आल्यानंतर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या गंभीर प्रकाराबाबत विशेष तपास पथक (एसआयटी) जरूर नेमले आहे. परंतु, याबाबत अद्याप पोलिसांकडून कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही. प्रभू श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे बँक खाते आणि देणगीच्या व्यवहारांमध्ये काही शेकडो कोटींच्या आर्थिक गैरव्यवहाराचे कथित आरोप आहेत. तसेच, दानपेटीच्या रकमेतील चोरीप्रकरणी अयोध्या पोलिसांकडे आतापर्यंत ३ वेगवेगळ्या तक्रारी जरुर दाखल झाल्या आहेत. मात्र तक्रार दाखल होऊनही पोलिसांकडून अद्याप याप्रकरणी एफआयआर (गुन्हा) दाखल झालेला नसल्याने भाविकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. एसआयटीसोबत तपास सीबीआय किंवा निवृत्त न्यायालयीन न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली करण्याची मागणी जोर धरत आहे. तपास यंत्रणा सध्या कामाला लागल्या असून यातून नेमके काय निष्पन्न होते, हे येणारी वेळच सांगेल. परंतु, राम मंदिराच्या निर्मितीनंतरही त्याचे योग्यपणे व्यवस्थापन करण्यात आपल्याकडील यंत्रणा या पूर्णपणे अपयशी ठरल्या आहेत. कटू असले तरी ते सत्य आहे. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

भारताच्या शत्रूराष्ट्रांमधील काही दहशतवादी संघटनांकडून धमक्या आल्यास किंवा आपल्याच देशांतर्गत असणाऱ्या सुरक्षा यंत्रणांकडून अलर्ट दिल्यानंतर अयोध्येतील सुरक्षा व्यवस्थेत आतापर्यंत नेहमीच वाढ केली जायची. अतिरिक्त सुरक्षा व्यवस्था तैनात करण्याकडे लक्ष केंद्रित केलेच पाहिजे. त्याबाबत दुमत नाही. परंतु, इतकी चोख सुरक्षा व्यवस्था असतानाही मंदिरातील दानपेटीतील रक्कम सुरक्षित राहत नसेल तर व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे, हे स्वाभाविक आहे. भारतात राहूनही शत्रूराष्ट्रांच्या दहशतवादी संघटनांसाठी काम करणाऱ्या काही देशद्रोह्यांना पकडल्यानंतर त्यांच्या चौकशीतून राम मंदिर त्यांच्या निशाण्यावर असल्याचे समोर यायचे. भारताबाहेरील शत्रूराष्ट्रांच्या परदेशी यंत्रणांकडून अयोध्येतील राम मंदिराला धोका आहे, अशी चर्चा आपल्याला नेहमी ऐकायला मिळते. राम मंदिर निर्मितीचा राग काही शत्रूराष्ट्रांच्या मनातून गेलेला नाही. तो कायमच असून मंदिरालाही धोका कायमच आहे. म्हणून येथे नेहमी कडेकोट सुरक्षा बंदोबस्त असायलाच हवा. भारतात घडणाया बॉम्बस्फोटांमागे तसेच दहशतवादी हल्ल्यांमागे परदेशी शक्तींचा हात असल्याचे तपासातून समोर येते. भारतातील घातपातामागे नेहमी परदेशी शक्तींमागे बोट दाखवले जाते. परंतु, राम मंदिराच्या दानपेटी घोटाळ्यामागे कोणत्याही परदेशी शक्तींचा हात असल्याचे आतापर्यंत समोर आलेले नाही. येथील मंदिराचे व्यवस्थापन, सुरक्षा व्यवस्था आदी सर्व आपल्याच देशाच्या हाती होते. तरी घोटाळा झालाच. झाला तोही तेथे, जेथे तमाम हिंदू धर्मीयांचे श्रद्धास्थान आहे त्या अयोध्येतील प्रभू श्रीरामाच्या मंदिरात. हा काही साधासुधा घोटाळा नसून भाविकांच्या आस्थेवर आणि निरागस श्रद्धेवर क्रूरपणे डल्ला मारण्याचा समाजकंटकाचा प्रकार आहे. या देशात भ्रष्टाचाराची, गैर मागार्तून पैसे कमावण्याची कीड ही इतकी खोलवर रुजली आहे की, यातून प्रभू श्रीरामाचे मंदिरही काही सुटलेले नाही.

देशातील प्रत्येक विभागात होणारा भ्रष्टाचार, हा काही आपल्यासाठी नवीन राहिलेला नाही. गैर मार्गाने झटपट पैसे कमावून श्रीमंत होण्याची जणू काही स्पर्धाच देशवासीयांमध्ये सुरू झाली आहे. आपण कोणत्या ठिकाणी आहोत आणि काय करत आहोत, याचे काही एक भान राहिलेले नाही. राम मंदिरासारख्या ट्रस्टमध्ये दानपेटीतील रोख रक्कम मोजण्याचे पवित्र काम हाती असतानाही तेथे चोरी करण्याचा विचार तेथील काही कर्मचाऱ्यांच्या मनात आला. सुरुवातीच्या काळात साधारणपणे ५ ते ७.५ कोटी रुपयांचा अपहार झाल्याचा अंदाज वर्तवण्यात आला होता. परंतु, उत्तर प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष अजय राय आणि पक्षाच्या इतर नेत्यांनी पत्रकार परिषदेत हा घोटाळा तब्बल १४०० कोटी रुपयांचा असल्याचा खळबळजनक आरोप केला आहे. राम मंदिर ट्रस्टच्या जून २०२६ मधील अंतर्गत ऑडिटदरम्यान (लेखापरीक्षण) दानपेटीतील रक्कम गायब असल्याचे समोर आले. सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर काही संशयास्पद हालचाली दिसल्या. दानपेटीतील पैसे मोजणाऱ्या लवकुश मिश्रा नावाच्या कर्मचाऱ्याच्या घरातून पोलिसांनी तब्बल १० लाख रुपयांची रोख रक्कम जप्त केल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, ज्या कर्मचाऱ्यांचा मासिक पगार अवघा १८ ते २० हजार रुपये आहे, त्यांनी अल्पावधीतच दीड कोटी आणि ४० लाख रुपयांच्या जमिनी खरेदी केल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. यावरून या चोरीची पाळेमुळे किती खोलवर रुजली आहेत, याचा अंदाज येतो. आतापर्यंत केवळ एका लवकुश मिश्राचा कारनामा समोर आला आहे. आणखी अशा अनेक कर्मचाऱ्यांची चौकशी होणार असल्याचे समजते.

ज्या लवकुश मिश्राच्या घरी मोठ्या प्रमाणात रोख रक्कम सापडली होती, त्याचा मेहुणाही राम मंदिराच्या ट्रस्टमध्ये याचठिकाणी कामाला असल्याचे सांगण्यात येते. लवकुश मिश्राच्या घरी जेव्हा पोलिसांच्या धाडी पडल्या तेव्हा शेणाच्या गोवऱ्यांमध्ये १० लाख रुपयांची रोकड मिळाली. या कुटुंबाने काही मोक्याच्या ठिकाणी जमिनी विकत घेतल्याची माहिती आहे. तसेच, अयोध्येतच एक आलिशान घरदेखील लवकुश मिश्राने घेतल्याचे बोलले जाते. जेमतेम १८ ते २० हजारांच्या पगारांमध्ये हे शक्य नाही. राम मंदिरातील दानपेटीवर डल्ला मारल्यानेच त्याच्यासाठी हे सर्व शक्य असल्याचे बोलले जात आहे. पोलीस तपासात याबाबत लवकरच खुलासा होईलच. लवकुश मिश्रा जेव्हा सुट्टीवर आपल्या मूळगावी यायचा तेव्हा दारूच्या अड्ड्यांवर ५० हजारांची रोकड सहजपणे खर्च करायचा, अशीही चर्चा गावात आहे. राम मंदिर हे भाविकांचे पवित्र श्रद्धास्थान. परंतु, त्याठिकाणी आचरणाने अशा अपवित्र माणसांची नेमणूक का करण्यात आली, हे दिवस पाहण्यासाठीच राम मंदिराचा अट्टाहास करण्यात आला होता का, याची उत्तरे कोण देणार?

आग, प्रशासन आणि विश्वासघात



भारतातील बहुतांश शहरांमध्ये हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, मॉल्स, क्लब्स आणि व्यावसायिक संकुलांची संख्या झपाट्याने वाढत आहे. पर्यटन, व्यवसाय आणि शहरीकरणामुळे अशा आस्थापनांची गरज वाढली आहे; मात्र या वाढीच्या वेगाला सुरक्षा व्यवस्थेची साथ मिळालेली दिसत नाही. अनेक ठिकाणी अग्निसुरक्षेची साधने केवळ नियम पूर्ण करण्यासाठी बसवलेली असतात. त्यांची नियमित तपासणी होत नाही, कर्मचारी प्रशिक्षित नसतात. आपत्कालीन परिस्थितीत लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रणा कागदावरच अस्तित्वात असते. परिणामी, आग लागल्यावर काही मिनिटांतच परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाते. दिल्लीतील दुर्घटनेने याच वास्तवावर पुन्हा शिक्कामोर्तब केले. राजधानीसारख्या शहरात, जिथे सर्वाधिक प्रशासकीय यंत्रणा कार्यरत आहेत, तिथेही जर अशा प्रकारची दुर्घटना घडू शकते, तर देशातील इतर शहरांची स्थिती किती गंभीर असेल याची सहज कल्पना करता येते. गोव्यातील पबमधील अशाच स्वरूपाच्या अलीकडील दुर्घटनेनंतर देशभरातील हॉटेल्स आणि मनोरंजन केंद्रांची सुरक्षा तपासण्याची मागणी झाली होती.

काही ठिकाणी मोहिमा राबवण्यात आल्या, नोटिसा देण्यात आल्या आणि नियमांचे पालन करण्याचे आदेश देण्यात आले; मात्र त्यानंतर काय झाले, हा प्रश्न आज अधिक तीव्रतेने उपस्थित होत आहे. खरे पाहता, भारतात अग्निसुरक्षेसाठी कायदे आणि नियमांची कमतरता नाही. प्रत्येक व्यावसायिक इमारतीला अग्निशमन विभागाचे प्रमाणपत्र आवश्यक असते. ठरावीक क्षमतेपेक्षा मोठ्या इमारतींसाठी आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग, अग्निशामक यंत्रणा, धूर नियंत्रण प्रणाली, फायर अलार्म, स्प्रिंकलर यंत्रणा आणि नियमित सुरक्षा सराव बंधनकारक आहेत. प्रश्न नियमांचा नसून त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीचा आहे. परवानगी घेतल्यानंतर इमारतींमध्ये अनधिकृत बदल, अतिरिक्त बांधकामे आणि सुरक्षेच्या अटींचे उल्लंघन अनेकदा दिसून येते. याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष कसे होते, हा महत्त्वाचा मुद्दा आहे. महापालिका, नगरपालिका आणि विकास प्राधिकरणांची भूमिका यात निर्णायक असते; मात्र अनेकदा नियमभंग करणाऱ्या इमारतींवर वेळेत कठोर कारवाई होत नाही. परिणामी नियम पाळणाऱ्यांपेक्षा नियम तोडणाऱ्यांना फायदा मिळतो.

ही परिस्थिती बदलल्याशिवाय अशा दुर्घटना रोखणे कठीण आहे. सर्वोच्च न्यायालयाने अनेकदा अग्निसुरक्षेबाबत चिंता व्यक्त करून शाळा, रुग्णालये, व्यावसायिक इमारती आणि सार्वजनिक ठिकाणांसाठी कठोर निर्देश दिले आहेत. मात्र अनेक राज्यांमध्ये त्यांची अंमलबजावणी अजूनही संथ आहे. दिल्ली आणि गोव्यातील दुर्घटना या प्रशासकीय दुर्लक्षाची उदाहरणे आहेत. अग्निसुरक्षेतील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ‘फायर ऑडिट’. हे केवळ अग्निशामक यंत्रांची तपासणी नसून इमारतीची रचना, विद्युत व्यवस्था, आपत्कालीन मार्ग आणि बचाव तयारीचे संपूर्ण परीक्षण असते. मात्र अनेक ठिकाणी फायर ऑडिट केवळ कागदोपत्री औपचारिकता ठरते. ही पद्धत बदलून नियमित आणि प्रभावी सुरक्षा तपासणी करणे गरजेचे आहे.

परदेशी पर्यटकांच्या मृत्यूमुळे अशा दुर्घटनांना आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त होते. भारत पर्यटन क्षेत्राला प्राधान्य देत असताना पर्यटकांना सुरक्षित वातावरण देणे तितकेच आवश्यक आहे. हॉटेल किंवा पर्यटनस्थळी परदेशी नागरिकाचा मृत्यू झाल्यास त्याचा परिणाम भारताच्या प्रतिमेवर आणि पर्यटन उद्योगावर होतो, कारण पर्यटन हा विश्वासावर आधारित उद्योग आहे. वारंवार होणाऱ्या दुर्घटनांमुळे भारताच्या सुरक्षित पर्यटनस्थळाच्या प्रतिमेला धक्का लागू शकतो. मोठ्या दुर्घटनांनंतर चौकशी आणि कारवाईची आश्वासने दिली जातात; मात्र काही काळानंतर विषय विस्मरणात जातो. ही प्रवृत्ती बदलून अग्निसुरक्षा आणि पर्यटकांची सुरक्षितता ही केवळ औपचारिकता नसून सार्वजनिक सुरक्षेची जबाबदारी आहे, याची जाणीव प्रशासन आणि आस्थापनांनी ठेवणे गरजेचे आहे. दिल्लीतील दुर्घटनांनी देशासमोर एक कठोर प्रश्न उभा केला आहे. आपण विकासाच्या नावाखाली उभ्या करत असलेल्या इमारती खरोखर सुरक्षित आहेत का? परवाना प्रणाली जनतेच्या सुरक्षेसाठी काम करते, की केवळ महसूल गोळा करण्यासाठी? न्यायालयीन आदेशांची अंमलबजावणी होते, की त्यांची केवळ नोंद घेतली जाते? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे शोधण्याची वेळ आता आली आहे.

कारण प्रत्येक दुर्घटनेनंतर व्यक्त होणारे दुःख महत्त्वाचे असते; पण त्याहून महत्त्वाची असते ती त्यातून घेतलेली शिकवण. दिल्ली आणि गोव्याच्या दुर्घटनांनंतरही प्रशासन जागे झाले नाही, तर भविष्यातील प्रत्येक आग ही केवळ अपघात म्हणून नव्हे तर व्यवस्थेने केलेला विश्वासघात म्हणूनच नोंदली जाईल. भारताला सुरक्षित, जबाबदार आणि विश्वासार्ह राष्ट्र म्हणून उभे करायचे असेल तर अग्निसुरक्षेला घोषणांमधून बाहेर काढून प्रत्यक्ष कृतीत आणावे लागेल. अन्यथा, आगी विझतील, राख थंड होईल; पण निष्काळजीपणाची ठिणगी कायम पेटतीच राहील. देशातील पर्यटनाचे मुख्य केंद्र असलेल्या दिल्ली आणि गोव्यासारख्या राज्यांमध्ये परदेशी पर्यटकांनाही या अग्नितांडवात आपले प्राण गमवावे लागले. ही बाब केवळ अंतर्गत सुरक्षेचा प्रश्न उरलेली नाही, तर यामुळे जागतिक स्तरावर भारताची प्रतिमा कमालीची मलिन होत आहे. ‘अतिथी देवो भव’चा नारा देणाऱ्या देशात परदेशी पाहुणे जर शासकीय अनास्थेचे बळी ठरणार असतील, तर आपण जागतिक महासत्ता बनण्याच्या बाता मारणे थांबवायला हवे.

कोणतीही मोठी आग लागली, की यंत्रणांना तात्पुरती जाग येते. चौकशी समित्या नेमल्या जातात, काही अधिकाऱ्यांवर निलंबनाची जुजबी कारवाई होते आणि हॉटेल सील करण्याचे नाटक केले जाते; परंतु मूळ रोगावर इलाज करण्याचे धाडस कोणीही दाखवत नाही. दिल्ली आणि गोव्याच्या घटनांमध्ये एक समान धागा दिसून येतो; तो म्हणजे नियम धाब्यावर बसवून चालवले जाणारे व्यवसाय. हॉटेल मालक आणि स्थानिक प्रशासनातील भ्रष्ट अधिकारी यांचे साटेलोटे असल्याशिवाय हे शक्यच नाही. डोळ्यांदेखत नियम पायदळी तुडवले जात असताना महानगरपालिकेचे प्रभाग अधिकारी आणि अग्निशामक दलाचे निरीक्षक काय करत असतात, हा खरा प्रश्न आहे. दुर्घटना घडल्यावर हॉटेल मालकाला जबाबदार धरून प्रशासन आपले हात झटकून मोकळे होते; परंतु ज्या अधिकाऱ्यांनी या बेकायदेशीर कृत्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले, त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा खटला का भरला जात नाही, या प्रश्नाचे उत्तर कधीच मिळत नाही.

राजकीय नैतिकतेचा लज्जास्पद लिलाव!

राज्यात अनेक महिने सुरू असलेल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या फुटीवरून मंगळवारची रात्र आणि बुधवार अख्खा दिवस ढवळून निघाला. अनेक महिन्यांपासून ऑपरेशन टायगरची चर्चा सुरू होती. त्यामुळे बुधवारी दिवसभर सुरू असलेला राजकीय गोंधळ अपेक्षितच होता. यापूर्वी 22 जून 2022 म्हणजेच चार वर्षांपूर्वी तेही विधान परिषदेच्या निवडणुकीतच शिवसेनेत मोठी फूट पडली होती. एकनाथ शिंदे यांनी 25 आमदारांना सोबत घेत आधी सूरत, त्यानंतर गुवाहाटी आणि नंतर गोवा करत मुंबई गाठली होती. त्यानंतर फुटलेल्या आमदारांची संख्या 41 वर पोहोचली होती. त्या बळावर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री बनले होते तर जास्त आमदार असूनही देवेंद्र फडणवीस यांना उपमुख्यमंत्रीपद स्वीकारावे लागले होते. या ऐतिहासिक राजकीय फुटीला चार वर्षे होत असताना ठाकरे गट पुन्हा फुटला आहे. यावेळी त्यांचे सहा खासदार बाजूला झाले आहेत. वरवर पाहता ही घटना खूप गंभीर असली तरी कायद्याच्या तरतुदीनंतर दोन-तृतीयांश आमदार-खासदार फुटत असतील तर त्यांना वेगळा गट स्थापन करता येतो. त्यानंतर ते कोणत्याही पक्षात विलीन होऊ शकतात. त्यामुळे सर्वकाही नियमानुसार होत असले तरी प्रश्न कायद्यातील तरतुदींचा आहे तसाच लोकप्रतिनिधींच्या नैतिकतेचाही आहे. शिवाय मतदारांचा मुद्दा यात खूप महत्त्वाचा आहे. आता शिवसेनेचे सहा खासदार फुटले असले तरी खरे चित्र गुरुवारी स्पष्ट होणार आहे. मुद्दा असा आहे की, ज्या तिकिटावर निवडणूक लढवली जाते त्या लोकप्रतिनिधीला पक्ष बदलायचा असेल तर त्याने काय करायला हवे? कायद्यातील तरतूद, पक्षांतरबंदी कायदा हे सर्व असले तरी नैतिकता आणि सामाजिक भान खूप महत्त्वाचे असते. म्हणूनच जेव्हा पक्ष बदलण्याचा प्रश्न येतो तेव्हा प्रथम जो पक्ष सोडता त्या पक्षनेतृत्वाची परवानगी आणि मतदारांची इच्छा खूप महत्त्वाची असते. कारण मतदार एखाद्या पक्षाला पसंती देत असतात, त्या पक्षाच्या चिन्हावर मतदान करत असतात. म्हणजे त्या पक्षाकडून त्यांच्या काही अपेक्षा असतात किंवा त्या पक्षाचा जाहीरनामा मतदारांना भावला म्हणून ते त्या उमेदवाराला पसंती देतात. असे असताना जर विजयी उमेदवाराला त्याच्या राजकीय फायद्यासाठी पक्ष बदलायचा असेल तर काय करायचं? नियमानुसार पक्षातील दोन-तृतीयांश लोकप्रतिनिधींना वेगळा गट स्थापन करता येतो. मात्र, यात नैतिकतेचा मुद्दा विसरता येणार नाही. ज्यांच्या मतांमुळे आपण निवडून येतो, जो पक्ष मोठ्या विश्वासाने तिकीट देतो त्यांची एकप्रकारे ही फसवणूकच आहे. उदाहरण घ्यायचे तर 2024 मध्ये लोकसभा निवडणुकीत हिंगोलीत ठाकरे गटाचे उमेदवार नागेश पाटील-आष्टीकर विरुद्ध शिवसेनेचे बाबूराव कदम कोहळीकर असा सामना होता. यात ठाकरे गटाचे नागेश पाटील-आष्टीकर विजयी झाले. मात्र, हेच आष्टीकर आता वेगळा गट स्थापन करून नंतर शिवसेनेत जाणार असतील तर या निवडणुकीला किती अर्थ उरला, असा सर्वसामान्यांना प्रश्न पडला आहे. हा प्रश्न अगदी रास्त आहे. कारण मतदारांनी ठाकरे गटाच्या आष्टीकरांना विजयी केले म्हणजे एकनाथ शिंदे यांच्या उमेदवाराला नाकारले. जर हेच आष्टीकर एकनाथ शिंदेंसोबत जात असतील तर ती मतदारांशी प्रतारणा ठरणार नाही का? याचा खूप गांभीर्याने विचार व्हायला हवा. हा विचार आधी राजकीय पातळीवर व्हायला हवा, दुर्दैवाने प्रत्यक्षात तसे होत नाही. हे केवळ शिवसेना, ठाकरे गट, भाजप, काँग्रेस असे कुठल्याही एका पक्षासाठी नाही. किंबहुना दुर्सया कुठल्याही राजकीय पक्षात जायचे असेल तर ज्या पक्षाचे आमदार, खासदार, नगरसेवक असाल तिथला प्रथम राजीनामा द्यायला हवा. त्यानंतर ज्या पक्षात प्रवेश करणार त्याच्या चिन्हावर निवडणूक लढवायला हवी. आमदार किंवा खासदाराला लालूच दाखवून आपल्या पक्षात प्रवेश देणे हा मतदारांच्या मतदान अधिकाराचा घोर अपमान आहे, याची जाणीव व्हायला हवी. तसे होत नाही म्हणून आपल्याकडे फुटणाऱ्या आमदार, खासदारांवर गद्दारीचे तसेच 50 कोटी, 15 कोटींचे आरोप केले जात आहेत. आमदार, खासदार हे कायदा बनवर्णाया सभागृहाचे सदस्य असतात. त्यांनीच नैतिकता गुंडाळून ठेवली तर त्या पदाचा आणि सभागृहाचा उपयोग काय? मुख्य म्हणजे आमदार, खासदार, मंत्री आदी लोकांचे प्रतिनिधी म्हणून न राहता वैयक्तिक स्वार्थासाठी कुठल्याही पक्षात कुठलेही बंधन न बाळगता जात असतील तर त्या निवडणुकीला काही अर्थ उरत नाही. लोकशाहीत निवडणुकांना खूप महत्त्व आहे. पारदर्शक निवडणूक होणे खूप गरजेचे आहे. त्यापेक्षा बिनविरोध निवडणूक करण्यावर आणि त्यानंतरही निवडणूक लढवण्याचा आग्रह धरणार्यांवर उमेदवारी मागे घेण्यासाठी किती आणि कसा आग्रह केला जातो, हे या विधान परिषद निवडणुकीत सर्वांनी पाहिले आहे. दबावतंत्राचा वापर कशासाठी केला जात आहे? निवडणूक हा लोकशाहीचा आत्मा आहे. अशावेळी निवडून येणारे लोकप्रतिनिधी नैतिक जबाबदारीपासून दूर जाऊ शकत नाहीत. जरी पक्षांतरबंदी कायदा असला तरी त्यातील पळवाटांचा गैरफायदा घेऊन सामाजिक जबाबदारी झटकून टाकणारे प्रकार सर्रास घडत आहेत. सध्या बंडखोरीच्या किंवा फुटीच्या प्रकरणातून एक बाब प्रकर्षाने लक्षात येते. ती म्हणजे कुठल्याही पक्षाच्या आमदार किंवा खासदाराला गळाला लावणे सोपे बनले आहे. त्यासाठी नैतिकता पायदळी तुडवली जाते. हे थांबवण्याची गरज आहे. यासाठी निवडणूक कायद्यात बदल करण्याची गरज आहे. तरच या राजकीय नैतिकतेच्या लज्जास्पद लिलावाला आळा बसू शकेल.

कलाकंद



साहित्य : १ लिटर दुध, १/२ टीस्पून सायट्रिक ॲसीड, किंवा एका लिंबाचा रस, दीडशे ग्राम खवा, ३/४ कप साखर (साधारण १५० ते १७५ ग्राम), १/२ टीस्पून वेलची पुड, पिस्त्याचे पातळ काप

कृती : दुध जाड बुडाच्या पातेल्यात गरम करत ठेवावे. दुध गरम झाले कि त्यात चिमटीचिमटीने सायट्रिक ॲसीड घालून तळापासून ढवळावे. दुध फाटले कि सुती कपड्यावर पनीर गाळून घ्यावे. गाळलेले पनीर फडक्यातच असताना गार पाण्याने थोडे धुवून घ्यावे म्हणजे लिंबाची/ सायट्रिक ॲसीडची आंबट चव आणि वास निघून जाईल. गच्च पिळून पनीर लगेच काढून एका वाडग्यात ठेवून द्यावे. खवा आणि साखर एकत्र करून नॉनस्टिक भांड्यात मध्यम आचेवर गरम करत ठेवावे. साखर वितळली कि मिश्रण पातळ होईल. सतत ढवळत राहावे. ५ मिनिटांनी पनीर आणि वेलची पुड घालावी. पनीर घातल्यावरही ढवळत राहावे. मिश्रण आळून गोळा बनायला सुरुवात झाली कि लगेच टीनच्या ट्रेमध्ये मिश्रण जाडसर पण एकसमान पसरवावे. वरून पिस्त्याचे काप घालावे. गार झाल्यावर वड्या पाडाव्यात. वड्या उरल्या तर फ्रीजमध्ये ठेवाव्यात.

डान्स करताय? हे फायदे समजून घ्याच

नृत्य हे मन, शरीर आणि आत्मा यांच्यासाठी समग्र क्रियाकल्प आहे. नृत्य एक शारीरिक क्रियाकल्प आणि सर्जनशील भावनेच्या माध्यमातून वापरल्याने, निर्माण होणारी ऊर्जा कुशलतेने हाताळण्यास मदत करते आणि यामध्ये नृत्य आणि परफॉर्मिंग आर्ट कौशल्य, ज्ञान आणि समज विकसित होण्यास मदत होते. नृत्य शिकण्यासोबतच लोक काही तरी शोधत असतात आणि त्यांना आवडणाऱ्या ॲक्टिव्हिटीमध्ये सहभागी होतात. ज्या लोकांना अंतर्दृष्टी समजून घ्यायची असते त्यांना स्वत:ला व्यक्त करण्यासाठी एक प्लॅटफॉर्म मिळते आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व सकारात्मकरीत्या परिवर्तित होते.



सध्याच्या काळामध्ये आपला बहुमूल्य वेळ तंत्रज्ञान आणि सोशल मीडिया घेते, तेव्हा नृत्य हा एक असा छंद आहे जेथे एखादी व्यक्ती शिकू शकते, आनंद घेऊ शकते आणि त्याच वेळी कामही करू शकते. प्रत्येक वर्गामध्ये फिटनेस लेवल, आत्मविश्वास, लक्ष केंद्रित करणे, एकाग्रता, सांघिक भावना, सकारात्मक विचार, शिस्त, शरीराची ठेवण असे सर्वांगीण विकासाकडे लक्ष दिले जाते. डान्स नेहमी स्वच्छ वातावरणात शिकला जातो त्यामुळे मनही प्रसन्न राहते. प्रत्येक विद्यार्थ्याला किंवा ग्रुपकडे समान लक्ष दिल्याने समानतेची भावना मिळते. नृत्य शिकत असताना फक्त शारीरिक क्रियाकल्प करत नाहीत तर यामधून आत्मविश्वास वाढतो, रक्त अभिसरण प्रक्रिया सुधारते, मांसपेशी मजबूत होतात आणि वजन वाढते; चांगले समन्वय आणि कौशल्य विकसित होते. नृत्य हे शरीरातील ऊर्जा आणि भावना बाहेर सोडण्याचा एक चांगला मार्ग आहे. जेव्हा आपण नृत्य करतो तेव्हा घाम येतो आणि घामाद्वारे चांगले वाटणारे एण्डॉर्फिन बाहेर उत्सर्जित होते, ज्यामुळे आपल्याला आनंदी वाटते. चांगले संगीतही मनाला शांती देते. नृत्य हे संगीताला जिवंत रूप देण्याचे काम करते. शिकण्याची पद्धत ही परस्पर संवादात्मक असल्याने शिक्षण प्रक्रिया तणावमुक्त आणि अधिक मजेदार असते.

माझ्यासाठी आरोग्य ही एक मनाची स्थिती आहे आणि फिटनेस हा जगण्याचा मार्ग. तंदुरुस्त शरीरामध्ये निरोगी मन असते. नृत्य संपूर्ण फिटनेस, सहनशक्ती आणि स्नायूंची बळकटी तसेच संपूर्ण शरीरामध्ये ताकद वाढवण्यास मदत करते. यात कार्डियो व्हॅस्क्युलर / एरोबिक फिटनेस, कोर आणि शरीरातील लवचिकतेसाठी स्ट्रेचिंगचा समावेश केला जातो. ग्रुपमध्ये एकत्रितपणे काम केल्याने संघाचे महत्त्व तसेच सांघिक भावना वाढते. नृत्यासाठी भरपूर सहनशक्ती आवश्यक असते जी शरीर चपळ बनवण्यास मदत करते. अशा प्रकारे नृत्य मधून मनःशांती, एकाग्रता, चपळता, तंदुरुस्त आणि निरोगी राहण्यास मदत असे अनेक प्रकाचे फायदे होतात.

रिकाम्या पोटी प्या गुळ-जिऱ्याचे पाणी आरोग्यास ठरेल लाभदायक

प्रत्येकाच्या घरी स्वयंपाकघरामध्ये जिरे सहज उपलब्ध होते. जिऱ्याचा वापर अनेक भाज्या बनवताना केला जातो. जिऱ्यामुळे अन्न पचायला मदत होते. तसेच गुळदेखील आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. हिवाळ्यात गुळाचे सेवन केल्याने आरोग्याला अनेक फायदे होतात.

गुळ आरोग्यासाठी एक वरदान मानला जातो. आयुर्वेदातही गुळाचे महत्त्व सांगितलेले आहे. आपल्याला माहीत आहे की, गुळ आणि जिरे आपल्या आरोग्यासाठी किती फायदेशीर आहे? चला जाणून घेऊयात याचे शरीराला होणारे फायदे...

ॲनिमिया रुग्णांसाठी फायदेशीर : गुळ आणि जिऱ्याचे पाणी पिण्याने ॲनिमिया किंवा रक्ताची कमी भरून निघण्यास फायदेशीर ठरते. तसेच रक्तामधील अशुद्धता दूर होते.

डोकेदुखीपासून आराम : थंडीमध्ये बऱ्याच लोकांना डोकेदुखीचा त्रास जाणवतो. अशावेळी गुळ-जिऱ्याचे पाणी पिण्याने फायदा होतो.

कंबरदुखीवर फायदेशीर : हिवाळ्यात अनेकांना कंबरदुखीचा त्रास होतो. जर गुळ आणि जिऱ्याचे पाणी घेतल्याने कंबरदुखीपासून आराम मिळतो.

रोगप्रतिकार क्षमता वाढवते : गुळ आणि जिरे आपल्या शरीरात घाण साफ करण्यासोबतच शरीराची रोग प्रतिकारक क्षमता वाढवण्यास मदत करते.

मासिक पाळीच्या त्रासापासून आराम : गुळ आणि जिऱ्याचे पाणी घेतल्याने अनियमित मासिक पाळी आणि पोटदुखीच्या समस्या दूर होतात.



गुळ आणि जिऱ्याचे पाणी कसे बनवावे

एका वाडग्यात दोन कप पाणी घ्या. यामध्ये एक चमचा गुळाचा चुरा आणि एक चमचा जिरे टाकून चांगली उकळी घ्या. यानंतर हे पाणी कप घेऊन पिऊ शकता. मात्र लक्षात ठेवा, हे पाणी सकाळी रिकाम्या पोटी घेणे आवश्यक आहे.

दररोज पुढे जाण्याच्या शर्यतीत प्रत्येक व्यक्ती धकाधकीचं आयुष्य जगत आहे. लवकर पुढे जात लवकर यश मिळवण्याच्या नादात अनेक जण आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. सोपं, लवकर आणि जिभेच्या चवी पुरवण्यासाठी अनेक जण फास्ट फूडच्या आहारी गेले आहेत. या फास्ट फूडमुळेच अनेक जण लठ्ठपणाचे शिकार होत आहेत. अशाप्रकारे आलेला लठ्ठपणा कमी करणं तितकंसं सोपं नाही. लठ्ठपणामुळेच शरीरात अनेक प्रकारचे विकार बळावतात. अनेक आजारांचे कारण लठ्ठपणा असून शरीरातील लठ्ठपणामुळेच अनेक आजारांना निमंत्रण दिले जाते.



अनेक आजारांचे कारण लठ्ठपणा; असे ठेवा नियंत्रण

लठ्ठपणाचे निदान व्यक्तीच्या शारीरिक तपासणी आणि त्याच्या इतिहासावर अवलंबून आहे. लठ्ठपणामुळे आलेल्या रोगांची शक्यता तपासण्यासाठी व्यक्तीच्या 'बीएमआय' बॉडी मास इंडेक्सचे मापन केले जाते. आई-वडिलांपैकी एकाला लठ्ठपणा असल्यास मुलांमध्येही लठ्ठपणा होण्याची शक्यता असते. कॅलरीयुक्त आहार, जंक, फास्ट फूड, पेय पदार्थांचे अधिक सेवन यामुळे लठ्ठपणाची समस्या निर्माण होण्यास सुरुवात होते. फळं, भाज्या यांच्या कमी सेवनानेही व्यक्ती लठ्ठपणाचा शिकार होऊ शकतात. लठ्ठपणामुळे स्ट्रोक, कॅन्सर, प्रजनन क्षमता कमी होणे, ऑस्ट्रियोआर्थराइटिस, टाइप २ डायबिटीज, पित्ताशयाचे आजार, उच्च रक्तदाब, लिवरला सूज येणे, श्वास घेण्यास अडथळा, नर्व डिस्ऑर्डर यासारखे गंभीर आजार होण्याची शक्यता असते.

यासारखे आजार बळावू नये यासाठी नियमित व्यायामाने वजन नियंत्रणात ठेवू शकता. जोरात चालणे, पोहणे, सायकल चालवणे यासारखे व्यायाम करू शकता. दिवसांतून तीन वेळा नियमित आहार घ्या. काही लोक भूक लागण्यावर कोणत्याही वेळी खातात. वेळ न पाहता गोड पदार्थ आणि फास्ट फूड खातात. त्यामुळे लठ्ठपणा वाढीस लागतो. कमी कॅलरीयुक्त आहार, फळं, भाज्या, कडधान्यांचे सेवन करा. मिठाई, अल्कोहलचे सेवन अगदी कमी प्रमाणात करा. अतिरिक्त चरबी वाढवणारे पदार्थ खाण्यापासून लांब राहा.

कच्च्या केळ्याचे सेवन अनेक विकारांवर उपयुक्त

पिकलेली केळी आपल्या आहारामध्ये नेहमीच समाविष्ट असून, या फळाचे आपल्या आरोग्याच्या दृष्टीने असणारे फायदे आपल्या परिचयाचे आहेत. पोटॅशियम आणि क्षार मुबलक असणारे हे फळ पचण्यास हलके आहे. याच्या सेवनाने शरीरामध्ये त्वरित ऊर्जा उत्पन्न होत असते. म्हणूनच व्यायामापूर्वी एखादे केळे खाण्याचा सल्ला आहारतज्ज्ञ देत असतात. पिकलेल्या केळ्यांप्रमाणे कच्चे केळे देखील भाजी, भजी, कोफ्ते इत्यादी पदार्थ बनवण्याकरिता वापरले जात असते. पिकलेल्या केळ्यांप्रमाणेच कच्च्या केळ्याचे सेवनही आरोग्याच्या दृष्टीने अतिशय फायदेशीर म्हटले जाते. कच्च्या केळ्यांमध्ये फायबर आणि हेल्दी स्टार्च असून, ही तत्त्वे आतड्यांमध्ये कोणत्याही प्रकारचे 'ब्लॉकेज' उत्पन्न होऊ देत नाहीत. त्याचमुळे ज्यांना बद्धकोष्ठाचा त्रास आहे, त्यांनी कच्च्या केळ्यांचा समावेश आहारामध्ये अवश्य करावा. ज्यांना मधुमेह आहे, किंवा ज्यांना मधुमेह असल्याचे नुकतेच निदान झाले आहे, त्यांच्यासाठी कच्च्या केळ्याचे सेवन फायदेशीर आहे. याच्या सेवनाने शरीरातील ब्लड-शुगरची पातळी नियंत्रणात राहते. कच्च्या केळ्यामध्ये फायबरची मात्रा मुबलक असून, याच्या सेवनाने पोट अधिक काळ भरलेले राहते व त्यामुळे वारंवार भूक लागण्याची भावना होत नाही. याच्या सेवनाने पचनक्रियाही उत्तम राहते. त्यामुळे ज्यांना वारंवार अपचनाचा त्रास होतो, त्यांनी आपल्या आहारामध्ये कच्च्या केळ्याचा समावेश अवश्य करावा.



वजन घटवण्यासाठी 'पीनट बटर' उपयुक्त

सँडविचमध्ये लावण्यासाठी एक अतिशय पौष्टिक 'स्प्रेड' म्हणून 'पीनट बटर' म्हणजेच शेंगदाण्यांपासून तयार केले गेलेले बटर अतिशय लोकप्रिय होऊ लागले आहे. अतिशय पौष्टिक तत्त्वांनी परिपूर्ण असे पीनट बटर वजन घटवण्यासाठीही उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. पीनट बटरमध्ये असणारी प्रथिने, जीवनसत्त्वे आणि क्षार वजन घटवण्यास सहाय्यक आहेत. पीनट बटरच्या सेवनाने भूक लवकर शमत असून, त्यामुळे अन्नाचे सेवन आपोआपच कमी होते. याच्या सेवनाने शरीराची चयापचय शक्ती वाढत असून, त्यामुळेही वजन घटण्यास मदत होते. पीनट बटर पोळीबरोबर, भाकरीबरोबर किंवा गव्हापासून तयार केलेल्या ब्रेडसोबत खाता येऊ शकते. फळे किंवा कच्च्या भाज्यांच्या कापांच्या सोबतही हे बटर खाता येते. सकाळच्या नाश्त्यामध्ये ओटमिल घेत असल्यास किंवा दह्यामध्ये मिसळूनही पीनट बटरचे सेवन करता येते. मात्र वजन घटवताना पीनट बटर आहारामध्ये समाविष्ट करताना त्यामध्ये इतर 'ॲडीटिव्ह' असणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. पीनट बटर बाजारातून आणण्यापेक्षा घरी तयार करणे अधिक चांगले. हे बटर बनवण्यासाठी शेंगदाणे भाजून घ्यावेत आणि त्यांची साले काढून घ्यावीत. त्यानंतर शेंगदाणे मिक्सरमध्ये घालून थोडेसे शेंगदाण्याचे तेल घालावे, त्यानंतर मिक्सर सुरू करून शेंगदाणे तीन ते चार मिनिटे मिक्सरवर वाटावेत. तयार झालेल्या शेंगदाण्याच्या पेस्टला पीनट बटर म्हटले जाते. यामध्ये चवीला थोडेसे मीठ घालावे. तसेच आवडत असल्यास किंचित मध आणि दालचिनीची पूडही यामध्ये घालता येऊ शकते.



सुंदर, नितळ, गोरी त्वचा कोणाला नको असते. यासाठी लोक चेहऱ्यावर विविध प्रयोग करत असतात. मात्र कांदा आणि लसूणचा फेसपॅक तुम्ही कधी ट्राय केलाय का?

चेहरा उजळण्यासाठी कांदा आणि लसणाचा फेसपॅक



त्वचा उजळण्यासाठी लसूण फायदेशीर : लसूणमध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन बी६, सेलेनियम, झिंक असते. त्वचेवरील मुरुमे हटवण्यासाठी लसूण फायदेशीर आहे. लसणाच्या पेस्टमध्ये मध मिसळून हा पॅक लावल्यास चेहऱ्यास फायदा होता. पिंपल्सच्या जागी लसूणचा रस लावा, पिंपल्स लवकर बरे होतील आणि डाग राहणार नाहीत.

त्वचेसाठी वरदान आहे कांदा : कांद्यामध्ये अनेक व्हिटॅमिन असतात. याशिवाय अँटीऑक्सिडंट्सही असतात. कांद्याच्या रसात अँटी सेप्टिक, अँटी-बॅक्टेरियल यासारखे गुण असतात. ज्यामुळे त्वचेवरील मुरुमे निघून जातात.

कसा करावा वापर : तुम्ही रोजच्या डाएटमध्ये कच्च्या कांद्याचा वापर करू शकता. कांदा त्वचेसाठी चांगला. याशिवाय तुम्ही कांदा किसून त्याचा फेसपॅक बनवून वापरू शकता. तसेच कांद्याच्या रसाचाही वापर करू शकता.

घरगुती लिपस्टिक तयार करणे इतके सोपे

बाजारात मिळणारे कॉस्मेटिक महाग तर असतातच पण आपल्या स्कीनवर विपरित परिणाम करणारे असतात. त्यातून ओठ हे तर सर्वात नाजूक असतात, यावर रोज बाजारातील लिपस्टिक लावली तर ओठ काळे पडू लागतात. म्हणून येथे आम्ही सोपी पद्धत सांगत आहोत ज्याने आपण घरी लिपस्टिक तयार करू शकता.



साहित्य : एक बीट, १/२ कोकोनट ऑइल, १/२ चमचा मधमाश्यांचे मेण, १/२ चमचा कोको बटर

कृती : बिटाचे पातळ काप करून वाळू द्या. डिहायड्रेटरमध्ये हे काप १२० डिग्रीवर ८ तास ठेवून वाळवू शकता. नंतर मिक्सरमधून वाटून पावडर तयार करा. मंद आचेवर एका भांड्यात अर्धा ते १ कप पाणी टाकून त्यात मेण, कोकोबटर, कोकोनट ऑइल आणि बीट पावडर मिसळा. चांगले ढवळा. गडद रंगासाठी अधिक पावडर किंवा वाळलेल्या चेरीज वापरू शकता. घट्ट झाल्यावर मऊ कपड्याने गाळून घ्या. लिप कंटेनरमध्ये हे मिश्रण ओतून घ्या. थंड होऊ द्या. आपले लिपस्टिक तयार झाले. हे पूर्णपणे नैसर्गिक असल्यामुळे ओठ काळे पडणार नाहीत.

'ब्लॅक टी'चे असेही फायदे

ब्लॅक टीमुळे शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. भारतात सर्वाधिक प्यायले जाणारे पेय म्हणून चहाचा पहिला क्रमांक लागतो. चहा, कॉफी म्हटले की अनेक जण दुधाचा चहा, कॉफीला पसंती देतात. दुधाच्या चहाच्या तुलनेत खूप कमी लोकांना ब्लॅक टी आवडते. तुलनेने ब्लॅक टी चवीला चांगली लागत नसली तरी तिचे अनेक फायदे आहेत. बाजारात अनेक प्रकारच्या ब्लॅक टी उपलब्ध आहेत. घरात बनवली जाणारी ब्लॅक टी लिंबू रस टाकून घेता येते. बाजारात इंग्लिश ब्रेकफास्ट टी, अर्ल ग्रे टी, आसाम टी, दार्जिलिंग टी, निलगिरी टी असे चहाचे अनेक प्रकार उपलब्ध आहेत.



काही दिवसांपूर्वी अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीत एक संशोधन करण्यात आले होते. या संशोधनाचा अहवाल युरोपियन जर्नल ऑफ न्यूट्रिशनमध्ये पब्लिश करण्यात आला होता. या अभ्यासानुसार ब्लॅक टीमध्ये विविध प्रकारचे विशेष तत्त्व असल्याचे सिद्ध झाले आहे. ब्लॅक टीमधील चहाचे विशेष तत्त्व पोटात जाऊन मोठा प्रभाव पाडतात. ब्लॅक टीमुळे वजन घटवण्यास मदत होते. तसंच शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. विषारी द्रव्ये शरीरातून बाहेर निघाल्यामुळे कोणताही आजार बळावण्याची शक्यता कमी होते.

टॉक्सिंस शरीरातून बाहेर पडल्यामुळे आरोग्यही उत्तम राहण्यास मदत होते.

चहात ॲण्टी ऑक्सिडेंट सर्वाधिक असतात. अनेक संशोधनांतून संशोधकांनी ब्लॅक टी आणि ग्रीन टीमध्ये प्रोबायोटिक्स तत्त्व आढळून येत असल्याचे सांगितले आहे. प्रोबायोटिक्स तत्त्व शरीरात प्रतिरोधक सूक्ष्मजीवांच्या वाढीसाठी मदत करतात. ब्लॅक टी वजन नियंत्रणात ठेवून अनेक आजारांपासून बचावही करते.

ब्लॅक टीमध्ये दूध आणि साखर नसल्याने शरीरात फॅट जमा होत नाही. चहातील ॲण्टीऑक्सिडेंट शरीरातील अतिरिक्त चरबी न वाढू देण्याचे काम करते. एका संशोधनातून दिवसांतून तीन वेळा ब्लॅक टी पिण्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहत असल्याचे समोर आले आहे. डोकेदुखी होत असल्यास ब्लॅक टीमध्ये लिंबू टाकून प्यायल्याने डोकेदुखीत आराम मिळतो.



एलएलएम इन एन्व्हायरमेंटल लॉ हा पूर्णवेळ पीजी प्रोग्राम आहे ज्यामध्ये २ वर्षांचा कालावधी आहे ज्यामध्ये पर्यावरण संरक्षण, हवामान बदल संरक्षण आणि नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत वापर यासाठी स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय कायदेशीर फ्रेमवर्क समाविष्ट आहे. या अभ्यासक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना पर्यावरण कायद्याशी संबंधित विषय जसे की जल कायदा, व्यवसाय आणि व्यापार, विविध प्रकारचे प्रदूषण, जमिनीचे प्रश्न, पर्यावरणीय न्याय इत्यादी विषय शिकवले जातात.



एलएलएम एन्व्हायरमेंटल लॉ (पर्यावरण कायदा) मध्ये करिअर बनवा, पात्रता, अभ्यासक्रम, शीर्ष महाविद्यालय, व्याप्ती जाणून घ्या

पात्रता : उमेदवारांनी मान्यताप्राप्त महाविद्यालय किंवा विद्यापीठातून पदवी + एलएलबी किंवा बीएएलबीमध्ये बॅचलर पदवी असणे आवश्यक आहे. एलएलबी पदवीमध्ये उमेदवाराला एकूण किमान ६० टक्के गुण असणे आवश्यक आहे. उमेदवारांनी त्यांच्या पसंतीच्या महाविद्यालयांमध्ये जागा मिळवण्यासाठी CLAT-PG/AILET/DU LLM/ MHCET कायदा/LSATसारख्या कोणत्याही एक सामान्य प्रवेश परीक्षेतही पात्र असणे आवश्यक आहे. एसटी/एससी आणि ओबीसीमधील उमेदवारांना अनिवार्य प्रक्रिया म्हणून कोर्स प्रोग्राममध्ये ५ टक्के सूट दिली जाते.

प्रवेश प्रक्रिया : कोणत्याही सर्वोच्च विद्यापीठात एलएलएम एन्व्हायरमेंटल लॉ कोर्समध्ये प्रवेश घेण्यासाठी उमेदवारांना प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे. प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर, एक वैयक्तिक मुलाखत आहे आणि जर उमेदवारांनी त्यात चांगले गुण मिळवले तर त्यांना शिष्यवृत्ती देखील मिळू शकते.

नोंदणी : उमेदवार अधिकृत वेबसाइटवर जातात. अधिकृत वेबसाइटला भेट दिल्यानंतर अर्ज भरा. अर्ज भरल्यानंतर तो नीट तपासून घ्या, जर फॉर्ममध्ये चूक असेल तर तो नाकारला जाऊ शकतो. विनंती केलेली कागदपत्रे अपलोड करा. अर्ज सादर करा. क्रेडिट कार्ड किंवा डेबिट कार्डद्वारे ऑनलाइन फॉर्म फी भरा.

टप्पा २ : प्रवेश परीक्षा : जर उमेदवारांनी एलएलएम एन्व्हायरमेंटल लॉ मध्ये प्रवेश घेण्यासाठी उच्च विद्यापीठांचे लक्ष्य ठेवले असेल, तर त्यांच्यासाठी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करणे खूप महत्त्वाचे आहे. ज्यासाठी नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रवेशपत्र जारी केले जातात. ज्यामध्ये प्रवेश परीक्षेशी संबंधित सर्व माहिती दिली जाते जसे की परीक्षा कधी आणि कुठे होणार आहे, इत्यादी. एलएलएम बिझनेस लॉची प्रवेश प्रक्रिया CLAT-PG/AILET/ DU LLM/MHCET Law/LSAT इत्यादी प्रवेश परीक्षेवर अवलंबून असते. पात्र उमेदवारांची पुढील मुलाखतीच्या आधारे निवड केली जाते. प्रवेश परीक्षा झाल्यानंतर काही दिवसांनी, त्याचा निकाल जाहीर केला जातो, त्यासाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या वेबसाइट्स आणि सोशल मीडिया हँडलची नियमितपणे तपासणी करून स्वतःला अपडेट ठेवले पाहिजे. जे विद्यार्थी प्रवेश परीक्षेत पात्र ठरतील त्यांना विद्यापीठातर्फे मुलाखतीसाठी हजर राहण्यास सांगितले जाईल - एकतर ऑनलाइन (स्काईप, गुगल मीट, झूम) किंवा ऑफलाइन विद्यार्थ्यांना विद्यापीठ कॅम्पसमध्ये बोलावून. दरम्यान, इतर सर्व पात्रता निकषांची तपासणी केली जाते आणि जर विद्यार्थ्यांनी मुलाखतीत चांगली कामगिरी केली तर त्यांना एन्व्हायरमेंटल कायद्यातील एलएलएमचा अभ्यास करण्यासाठी प्रवेश दिला जातो.

अभ्यासक्रम

- मॉड्यूल I निसर्ग आणि पर्यावरण कायद्याची व्याप्ती
- मॉड्यूल II आंतरराष्ट्रीय कायदा आणि पर्यावरण संरक्षण
- मॉड्यूल III भारतातील पर्यावरण कायद्याचा इतिहास व विकास
- मॉड्यूल IV भारतीय संविधान अंतर्गत पर्यावरण संरक्षण
- मॉड्यूल V पर्यावरण संरक्षण, सामान्य नागरी, फौजदारी कायदा
- मॉड्यूल VI भारतातील पाणी, हवा आणि पर्यावरणाचे संरक्षण
- मॉड्यूल VII वन, वन्यजीव आणि जैवविविधतेचे संरक्षण
- मॉड्यूल VIII पर्यावरण कायद्यातील उदयोन्मुख समस्या


शीर्ष महाविद्यालये

- तामिळनाडू डॉ. आंबेडकर लॉ युनिव्हर्सिटी, तामिळनाडू
- हिदायतुल्ला राष्ट्रीय कायदा विद्यापीठ, रायपूर
- राष्ट्रीय कायदा विद्यापीठ आणि न्यायिक अकादमी, आसाम
- टेरी युनिव्हर्सिटी, नवी दिल्ली

ठाण्यात ९१ इमारती अतिधोकादायक

नौपाडा-कोपरी विभागात सर्वाधिक धोकादायक वास्तू

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिकेने सी-१ (अतिधोकादायक) श्रेणीतील ९१ इमारतींची यादी जाहीर केली असून, त्यापैकी ४२ इमारतींमध्ये अद्याप नागरिक वास्तव्यास आहेत. या इमारतींमध्ये सुमारे ८५२ नागरिक राहत असल्याने संभाव्य दुर्घटनांचा धोका कायम असून, महापालिकेने अशा इमारतींचा वीज व पाणीपुरवठा खंडित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.



५१ इमारती रिकाम्या, केवळ दोन पाडल्या

महापालिकेने आतापर्यंत ५१ इमारतींची तपासणी करून त्या रिकाम्या केल्या आहेत. मात्र, केवळ दोन इमारतींवर पाडकामाची कारवाई करण्यात आली आहे. काही रहिवाशांनी स्वेच्छेने घरे रिकामी केली असली तरी अनेक ठिकाणी स्थलांतरास विरोध होत असल्याने प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिकेने सी-१ (अतिधोकादायक) श्रेणीतील ९१ इमारतींची यादी जाहीर केली असून, त्यापैकी ४२ इमारतींमध्ये अद्याप नागरिक वास्तव्यास आहेत. या इमारतींमध्ये सुमारे ८५२ नागरिक राहत असल्याने संभाव्य दुर्घटनांचा धोका कायम असून, महापालिकेने अशा इमारतींचा वीज व पाणीपुरवठा खंडित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने तयार केलेल्या २०२६-२७ च्या अहवालानुसार शहरातील ९१ इमारती अतिधोकादायक घोषित करण्यात आल्या आहेत. यापैकी ५१ इमारती रिकाम्या करण्यात आल्या असून केवळ दोन इमारतींवर निष्कासन अथवा पाडकामाची कारवाई करण्यात आली आहे. मात्र, ४२ इमारतींमध्ये अजूनही रहिवासी राहत असल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे. अहवालानुसार, नौपाडा-कोपरी प्रभाग समिती हद्दीत सर्वाधिक ५२ अतिधोकादायक इमारती आहेत. त्यापैकी २४ इमारतींमध्ये अद्याप नागरिक वास्तव्यास आहेत. याशिवाय लोकमान्यनगर-सावरकरनगर परिसरात १६, वर्तकनगरमध्ये १४, माजीवडा-मानपाडा व उथळसर येथे प्रत्येकी ११, कळवा येथे ८, तर मुंब्रा आणि दिवा येथे प्रत्येकी तीन अतिधोकादायक इमारतींची नोंद करण्यात आली

वीजेसह पाणीपुरवठा खंडित करण्याची तयारी

अद्याप रिकाम्या न झालेल्या ४२ इमारतींचा वीज व पाणीपुरवठा बंद करण्यासाठी महापालिकेने हालचाली सुरू केल्या आहेत. त्यासाठी महावितरण आणि टोरेंट पॉवर कंपनीला वीजपुरवठा खंडित करण्याबाबत पत्र पाठविण्यात आले असून, पाणीपुरवठा विभागालाही नळजोडण्या बंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच संबंधित प्रभाग अधिकाऱ्यांना अतिधोकादायक इमारतींवर सातत्याने लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

अतिधोकादायक इमारतीतच केडीएमसीचा आपत्कालीन कक्ष... कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर



■डोंबिवली। प्रतिनिधी,

कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या डोंबिवली विभागीय कार्यालयाची इमारत गेल्या चार ते पाच वर्षांपासून अतिधोकादायक घोषित करण्यात आली असतानाही याच इमारतीच्या तळमजल्यावर आपत्कालीन कक्ष कार्यरत असल्याने कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. इमारतीतील इतर विभाग सुरक्षित स्थळी हलविण्यात आले असताना, आपत्कालीन विभाग मात्र अद्याप या पडक्या इमारतीतूनच सुरू आहे. इमारतीतील स्लॅबचे प्लास्टर अधूनमधून कोसळत असल्याने कर्मचारी दररोज भीतीच्या वातावरणात काम करत आहेत. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे कर्मचाऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून, एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. आपत्कालीन कक्षात ड्रेनेजचे पाणी साचत असल्याने कर्मचाऱ्यांच्या आरोग्यालाही धोका निर्माण झाला आहे. शहरात स्वच्छतेबाबत जनजागृती करणारे महापालिका प्रशासन स्वतःच्या कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित आणि स्वच्छ कार्यस्थळ उपलब्ध करून देण्यात अपयशी ठरत असल्याची टीका होत आहे.

बोगस डॉक्टरांना अभय कुणाचे? १८ गुन्हे दाखल

काहींना अटकही, तर अनेक दवाखान्यांवर कारवाई नाहीच

उल्हासनगर शहरातील कथित बोगस डॉक्टरांविरोधात महापालिकेने मोठ्या गाजावाजात कारवाई करत १८ जणांविरोधात गुन्हे दाखल केले, तर काहींना अटकही करण्यात आली. मात्र, वर्षभर उलटल्यानंतरही अनेक संशयित डॉक्टरांचे दवाखाने बिनधास्त सुरू असल्याचे वास्तव समोर आल्याने संपूर्ण कारवाईवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

■उल्हासनगर। प्रतिनिधी,

उल्हासनगर शहरातील कथित बोगस डॉक्टरांविरोधात महापालिकेने मोठ्या गाजावाजात कारवाई करत १८ जणांविरोधात गुन्हे दाखल केले, तर काहींना अटकही करण्यात आली. मात्र, वर्षभर उलटल्यानंतरही अनेक संशयित डॉक्टरांचे दवाखाने बिनधास्त सुरू असल्याचे वास्तव समोर आल्याने संपूर्ण कारवाईवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे या कथित बोगस डॉक्टरांना नेमके संरक्षण कुणाचे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

उल्हासनगर महापालिका आणि आरोग्य विभागाने मागील वर्षी शहरातील वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या २६ संशयित डॉक्टरांची चौकशी सुरू केली होती. मान्यताप्राप्त वैद्यकीय पदवी नसताना किंवा वादग्रस्त व अमान्य पदव्यांच्या आधारे वैद्यकीय व्यवसाय केल्याचा संशय व्यक्त करत जून २०२५ मध्ये तब्बल १८ कथित बोगस डॉक्टरांविरोधात विविध पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले होते. एका जागरूक डॉक्टरने सातत्याने पाठपुरावा करत माहिती अधिकारातून कागदपत्रे मिळवून तक्रारी केल्यानंतर ही कारवाई सुरू झाली होती.

कारवाईनंतर दोन डॉक्टरांना अटक करण्यात आली. मात्र, त्यानंतर या प्रकरणाची गती मंदावल्याचे दिसून आले. धक्कादायक बाब म्हणजे, गुन्हे दाखल झालेल्या अनेक डॉक्टरांचे दवाखाने आजही सुरू असल्याची माहिती जिल्हा आरोग्य विभागाने पत्राद्वारे महापालिकेला दिली होती. तरीही संबंधितांवर कोणतीही कठोर प्रशासकीय अथवा कायदेशीर कारवाई झालेली नसल्याचे समोर आले आहे.




दरम्यान, पोलीस विभागाने या प्रकरणांमध्ये आरोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, तपास प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रे, तांत्रिक अहवाल आणि पूरक माहिती वेळेत उपलब्ध करून देण्यात महापालिका व संबंधित विभागांकडून पुरेसे सहकार्य मिळत नसल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेलाही विलंब होत असल्याचे सांगितले जात आहे.

शहरातील हजारो नागरिकांच्या जीवाशी संबंधित असलेल्या या गंभीर प्रकरणात विविध यंत्रणांमधील समन्वयाचा अभाव उघड झाला असून, कारवाईचा केवळ दिखावा करण्यात आला की दोषींना जाणीवपूर्वक अभय दिले जात आहे, असा प्रश्न आता अधिक तीव्रतेने उपस्थित होत आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित या संवेदनशील प्रकरणात दोषींवर कठोर आणि निर्णायक कारवाई कधी होणार, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

"शहरातील कथित बोगस डॉक्टरांविरोधातील कारवाई अधिक कठोर करण्यात आली आहे. आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना व्यापक तपासणी मोहीम राबविण्याचे आदेश देण्यात आले असून, नियमबाह्य पद्धतीने वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांचे दवाखाने तत्काळ सील करून त्यांच्याविरोधात नव्याने गुन्हे दाखल करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. यापूर्वी अशा दवाखान्यांवर सील कारवाई करण्यात दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित आरोग्य अधिकाऱ्यांवरही प्रशासकीय कारवाई करण्यात आली आहे. दोषींना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही आणि कायद्यानुसार कठोर कार्यवाही करण्यात येईल."

-धीरज चव्हाण, अतिरिक्त आयुक्त महापालिका



चिकन शोरमा आणि पिज्झा खाल्ल्याने 60 जणांना विषबाधा, घटनास्थळी पथक पोहोचलं अन्...

भिवंडी : भिवंडी शहरातून एक धक्कादायक घटना समोर आलीय. भिवंडी परिसराती खंडू पाडा रोडवरील एका प्रसिद्ध दुकानातून शोरमा आणि पिज्झा खाल्ल्यानंतर अनेकांना विषबाधा झाल्याची घटना घडलीय. काल रात्री 10 ते 12 जणांना इंदिरा गांधी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र आता या आकड्यात वाढ होत असून सध्या रुग्णालयात 60 रूग्ण दाखल करण्यात आले आहे. एकाच वेळी 60 जणांना विषबाधा झाल्याची गंभीर घटना समोर आली आहे. उलटी, जुलाब आणि पोटदुखीच्या त्रासामुळे या सर्वांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं. सध्या सर्व रुग्णांवर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय अधीक्षकांनी दिली आहे. डॉ. पंदारे यांनी सांगितलं की, आपल्याकडे विषबाधेचे साधारणत 60 रुग्ण सध्या उपचार घेत आहेत. त्यांना उलटी, जुलाब आणि पोटात दुखणे या तक्रारी असून त्यांच्यावर औषधोपचार चालू आहे. अजूनही काही रुग्ण येत आहेत, असंही त्यांनी सांगितलं. त्यांना गॅस्ट्रोएन्टेरायटिस झाल्याचे डॉक्टरांनी सांगितलं आहे. सगळ्या रुग्णांची प्रकृती स्थिर असून त्यांच्यामध्ये १०० टक्के सुधारणा पाहिला मिळत आहे. दरम्यान विषबाधेचे नेमके कारण शोधण्यासाठी आरोग्य विभागाकडून तपास सुरू आहे.

पुन्हा लाचखोरीचा पर्दाफाश! सहायक निबंधक कार्यालयातील मुख्य लिपिक एसीबीच्या जाळ्यात

■नाशिक। प्रतिनिधी,

नाशिक जिल्ह्याला जणू लाचखोरीच्या ग्रहण लागले आहे. जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांमधील लाचखोरीचे प्रकार थांबण्याचे नाव घेत नाहीये. अशातच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) आणखी एक मोठी कारवाई केली आहे. येवला येथील सहायक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयातील मुख्य लिपिक सुधीर वाघ याला ५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराला सावकारी परवान्याचे नूतनीकरण करायचे होते. हे काम करून देण्यासाठी मुख्य लिपिक सुधीर वाघ याने यापूर्वी तब्बल ६० हजार रुपये घेतले होते. मात्र त्यानंतरही त्याने आणखी ७ हजार रुपयांची मागणी केली. तडजोडीनंतर ५ हजार रुपये स्वीकारण्याचे ठरले. पुन्हा पैसे देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने एसीबीकडे धाव घेतली.

तक्रारीची पडताळणी



केल्यानंतर एसीबीच्या पथकाने येवला तहसील कार्यालयाच्या आवारात सापळा रचला. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराकडून लाचेची रक्कम स्वीकारताच सुधीर वाघ याला रंगेहात पकडण्यात आले. पोलीस उपअधीक्षक स्वाती पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शरद हेंबाडे, युवराज खांडवी आणि चालक समीर शेख यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वी केली. विशेष म्हणजे, ज्या दिवशी नाशिक विधान परिषद निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया सुरू होती, त्याच दिवशी तहसील कार्यालयाच्या आवारात ही धडक कारवाई करण्यात आली.

दरम्यान, काही दिवसांपूर्वीच नाशिकमध्ये स्वतःला एसीबी अधिकारी म्हणून सादर करणाऱ्या एका तोतया अधिकाऱ्यालाही सातपूर पोलिसांनी अटक केली होती. उद्योग भवन परिसरात 'अँटी करप्शन'ची पाटी लावलेल्या मोटारीत फिरणाऱ्या सचिन ठोके याच्याकडे बनावट ओळखपत्र आढळून आले होते. त्याचा साथीदार रवींद्र द्विवेदी अद्याप फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

एका बाजूला एसीबीचे नाव वापरून फसवणूक करणारे तोतये सक्रिय आहेत, तर दुसऱ्या बाजूला एसीबीचे अधिकारी लाचखोरांविरोधात कठोर कारवाई करत असल्याचे या घटनांमधून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

वृद्ध दाम्पत्याकडून 4 लाख रुपये लुटले

पण खाते बंद केल्याने सायबर ठग संतापला अन्...

■मुंबई। प्रतिनिधी,

ऑनलाइन फसवणुकीला बळी पडल्यानंतर उरलेली रक्कम वाचवण्यासाठी बँक खाते बंद केले अन् सायबर ठग जर तुमच्यावरच संतापला तर... अशीच घटना जोगेश्वरी येथील एका वृद्ध दाम्पत्यासोबत घडली आहे. फसवणूक झाल्यानंतर दाम्पत्याने पोलिसांकडे धाव घेतली. दरम्यान, आंबोली पोलीस ठाण्यात एका अज्ञात भामट्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस तपास करत आहेत.

जोगेश्वरी पश्चिम भागात राहणाऱ्या 69 वर्षीय तक्रारदार महिला आपल्या पतीसोबत (जे उत्पादन शुल्क विभागाचे निवृत्त कर्मचारी आहेत) घरी एकट्याच राहतात, तर त्यांचा मुलगा आणि मुलगी दुसऱ्या शहरात राहतात. भामट्याने अवघ्या तीन दिवसात या दाम्पत्याच्या बँक खात्यातून सुमारे 3.80 लाख रुपये काढून घेतले. या फसवणुकीची सुरुवात 9 जून रोजी झाली, जेव्हा त्या महिलेला एका अनोळखी क्रमांकावरून व्हॉट्सॲप व्हिडीओ कॉल



आला. कॉल करणाऱ्या व्यक्तीने स्वतःची ओळख ऑनलाइन वस्तू पुरवठा करणाऱ्या कंपनीचा कर्मचारी म्हणून करून दिली आणि जुन्या व्यवहाराचे पैसे परत (रिफंड) मिळवून देण्याचे आमिष दाखवले. त्याने महिलेला तिच्या फोनची स्क्रीन शेअर करण्यास सांगितली. त्या महिलेने भामट्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून स्क्रीन शेअर केली. त्यानंतर तांत्रिक बिघाडाचे कारण सांगून भामट्याने कॉल कट केला. जेव्हा महिलेने तिचे ऑनलाइन वॉलेट तपासले, तेव्हा ते काम करत नसल्याचे तिला आढळले.

दुसऱ्या दिवशी (10 जून) त्याच भामट्याने पुन्हा व्हिडीओ कॉल केला. वॉलेट लवकरच सुरू होईल आणि पैसे परत मिळतील असे सांगून त्याने पुन्हा एकदा महिलेची स्क्रीन शेअर करून घेतली. 11 जून रोजी त्याने महिलेला पुन्हा फोन केला आणि कुटुंबातील अशा सदस्याचा क्रमांक मागितला ज्याचे ऑनलाइन वॉलेट सक्रिय आहे. महिलेने तिच्या पतीचा क्रमांक दिला. त्यानंतर भामट्याने महिलेच्या पतीला फोन केला आणि त्यांचीही स्क्रीन शेअर करून घेतली. स्क्रीन शेअर होताच महिलेच्या पतीच्या खात्यातून 98,205 रुपये कमी झाले. त्यांनी तत्काळ आपल्या पत्नीला या घटनेची माहिती दिली. जेव्हा महिलेने तिचे खाते तपासले, तेव्हा तिला समजले की गेल्या तीन दिवसात त्यांच्या खात्यातून टप्प्याटप्प्याने 2.80 लाख रुपयांहून अधिक रक्कम काढून घेण्यात आली आहे.

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच वृद्ध दाम्पत्याने खाते बंद करण्यासाठी बँकेकडे धाव घेतली. तर त्यांच्या मुलीने सायबर हेल्पलाईन क्रमांक 1930 वर तक्रार नोंदवली. खाते ब्लॉक होताच तो भामटा संतापला आणि त्याने त्या वृद्ध जोडप्याला फोन करून खाते ब्लॉक केल्याबद्दल त्यांना धमकावण्यास सुरुवात केली. भामट्याच्या या वागणुकीमुळे घाबरलेल्या जोडप्याने आंबोली पोलिसांशी संपर्क साधून अधिकृत तक्रार दाखल केली.

विद्यार्थी परीक्षेत नापास, 11 एक्सपायर्ड गोळ्या खाल्ल्या अन्...

■मुंबई। प्रतिनिधी,

बिहारच्या भगलपूरमध्ये एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. वडिलांनी खेळ खेळण्यास विरोध केल्याने तरुणाने घरात ठेवलेल्या 11 एक्सपायरी गोळ्या खाल्ल्या. कुटुंबीयांनी त्याला बुधवारी उपचारासाठी मायागंज रुग्णालयात नेले, जिथे त्याच्यावर उपचार सुरू असताना दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनं परिसर हादरून गेला.

मृत तरुण विद्यार्थ्याची कृष कुमार (वय 20) अशी ओळख समोर आली. तो इंटरमिजिएट्स परीक्षेत नापास झाला होता. तो खेळ खेळण्यात अधिक वेळ वाया घालवू लागला होता. त्याच्या वडिलांनी त्याला अभ्यास करण्यास सांगितले. वडिलांच्या ओरडा खाल्ल्यानंतर त्याने घरात ठेवलेल्या एक्सपायरी गोळ्या खाल्ल्या. हा धक्कादायक प्रकार बिहारच्या बांका येथील अमरपूर पोलीस ठाणे परिसरातील वॉर्ड क्रमांक 8 मध्ये घडली होती.

कृषने इंटरमिजिएटच्या विज्ञान या शाखेची निवड केली होती, त्यात नापास झालेल्या भागलपूर मनाली येथील एका कोचिंग इन्स्टिस्ट्यूटमध्ये प्रवेश घेतला होता. तिथली फी अधिक होती, त्याने पुन्हा परीक्षा दिली, त्याने मन लावून अभ्यास करत चांगले गुण मिळवावेत असं, त्याच्या कुटुंबीयांचं म्हणणं होतं.

मात्र, कृषला मोबाईल फोनचं अधिक व्यसन लागलं होतं, तो अधिककरून त्यात गुंतला. त्याचे कुटुंबीय त्याला रागावू लागले होते. वडील विवेक कुमार यांनी सांगितलं की, कृष कुमार परीक्षा देऊन परतला होता, मात्र नापास झाल्याने तो निराश झाला होता. त्याच्या वडिलांनी त्याला अभ्यासावर लक्ष केंद्रीत करण्याचा सल्ला दिला होता.

सेप्टिक टँकमध्ये पडून सहा वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू



भिवंडी : शहरातील फरीद बाग परिसरात इमारतीमधील निष्काळजीपणामुळे एका निष्पाप चिमुकल्याचा जीव गेल्याची हृदयद्रावक घटना सोमवारी सायंकाळी घडली. अल-फरीद इमारतीच्या पार्किंग परिसरात मित्रांसोबत खेळत असताना सेप्टिक टँकचे जीर्ण झाकण तुटल्याने त्यात पडून सहा वर्षीय मोहम्मद अहमद मसूद याचा दुदैर्वी मृत्यू झाला. या संपूर्ण घटनेचा थरार इमारतीच्या सुरक्षेसाठी लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. या घटनेनंतर संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून इमारतीच्या देखभालीकडे दुर्लक्ष करणाऱ्या व्यवस्थापनावर नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. शाळेचा पहिलाच दिवस असल्याने विद्यार्थ्यांना अर्धा दिवस सुट्टी देण्यात आली होती. दुपारी मोहम्मदचे वडील आपल्या मोठ्या मुलाला शाळेतून घरी घेऊन आले. त्यानंतर लहान मोहम्मद अहमद हा राहत्या इमारतीच्या पार्किंगमध्ये इतर मुलांसोबत खेळण्यासाठी गेला होता. खेळताना तो पार्किंगमधील सेप्टिक टँकवर ठेवलेल्या पत्र्याच्या झाकणावर उभा राहिला. मात्र हे झाकण आधीपासूनच खराब आणि कमकुवत असल्याने अचानक आत कोसळले आणि मोहम्मद थेट सेप्टिक टँकमध्ये पडला. त्याच्यासोबत खेळणाऱ्या मुलांनी आरडाओरडा करून घरच्यांना माहिती दिली. स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेत चिमुकल्याला बाहेर काढले आणि खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले.

आईच्या लिव्ह-इन पार्टनरनं 3 वर्षांच्या चिमुकल्याची केली निर्घृण हत्या

पुणे जिल्ह्यातून एक धक्कादायका प्रकार उघडकीस आला आहे. शिरूर तालुक्यातील रांजणगाव औद्योगिक वसाहतीच्या परिसरात 3 वर्षीय निष्पाप मुलाची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या घटनेनं परिसर हादरून गेला होता. धक्कादायक बाब अशी की, आईसोबत लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या 20 वर्षीय तरुणाने जीव घेतला आहे.

■पुणे। प्रतिनिधी,



पुणे जिल्ह्यातून एक धक्कादायका प्रकार उघडकीस आला आहे. शिरूर तालुक्यातील रांजणगाव औद्योगिक वसाहतीच्या परिसरात 3 वर्षीय निष्पाप मुलाची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या घटनेनं परिसर हादरून गेला होता. धक्कादायक बाब अशी की, आईसोबत लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या 20 वर्षीय तरुणाने जीव घेतला आहे. ते तिघेही रांजणगाव परिसरातच राहत होते. आरोपी तरुणाची देवांशी साहू अशी ओळख पटली.

चिमुरड्यावर दारूच्या नशेत हल्ला

प्राथमिक माहितीनुसार, आरोपीकडून महिलेवर मुलाला त्याच्या वडिलांकडे सोडून येण्यास तरुणाकडून दबाव टाकण्यात आला होता. यावरून मोठा वाद देखील उफळल्याची माहिती समोर आली. महिला एका कंपनीत उदरनिवार्हासाठी काम करत होती. ती कंपनीत गेल्यानंतर घरात एकट्या असलेल्या चिमुरड्यावर आरोपीनं दारूच्या नशेत हल्ला करून त्याची हत्या केली. या प्रकरणाचा पोलीस तपास घेत आहेत.

दरम्यान, ज्या दिवशी हा धक्कादायक प्रकार घडला तेव्हा परिसरात एकच हळहळ व्यक्त करण्यात आली. या घटनेनं नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. संबंधित प्रकरणात पोलिसांनी कारवाई करत आरोपी देवांशी साहूला ताब्यात घेत त्याच्यावर कारवाई केली. तसेच पोलीस त्याची चौकशी करत पुढील प्रकरणाचा तपास करत आहेत.

पुण्यात विवाहबाह्य संबंधांत मोठ्या प्रमाणात वाढ होऊ लागली आहे. तसेच घटस्फोटाच्या प्रमाणात देखील वाढ होऊ लागली आहे, अशा घटना सातत्याने घडत असल्याने सुखाचे संसार उद्ध्वस्त होताना दिसतात.



सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यावसायिकाला खंडणीसाठी धमकाविणाऱ्या रिलस्टारला अटक

■मुंबई। प्रतिनिधी,

मुलुंड परिसरातील एका व्यावसायिकाला खंडणीसाठी धमकाविर्णाया रणदीप हरबिंदरसिंग गुजराल या 40 वर्षाच्या रिलस्टार आरोपीस रविवारी (14 जून) गुन्हे शाखेच्या अधिर्कायांनी अटक केली. या गुन्ह्यांत रणदीपच्या कुटुंबातील दोन सदस्यासह इतर आरोपींचा सहभाग उघडकीस आला असून त्यांची लवकरच पोलिसांकडून जबानी नोंदवून चौकशी होणार आहे. अटकेनंतर रणदीपला किल्ला न्यायालयाने 18 जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. शासकीय अधिकारी असल्याची बतावणी तसेच ब्लॅकमेल करून ही टोळी सोशल मीडिया याच्या माध्यमातून खंडणी वसुली करत असल्याचे तपासात उघडकीस आले आहे.

यातील तक्रारदार व्यावसायिक असून ते गोवंडी परिसरात त्यांच्या कुटुंबियांसोबत राहतात. त्यांचा मुलुंड येथे पंजाबी पनीर नावाचे एक दुकान आहे. काही दिवसांपूर्वी त्यांच्या दुकानात आरोपी आला होता. त्याने स्वतःची ओळख शासकीय अधिकारी असल्याचे सांगून व्यावसायिकाच्या दुकानातील दुग्धजन्य पदार्थ खराब असल्याचे सांगून या पदाथार्ची विक्री करून व्यावसायिक सर्वसामान्यांची फसवणूक करत असल्याचा आरोप केला होता. तसेच आरोपीने व्यावसायिकाच्या दुकानात एक व्हिडीओ बनवून तो व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल करून व्यावसायिकासह त्यांच्या दुकानाची बदनामी केली होती. तसेच त्यांचा व्यवसाय बंद पाडण्याची धमकी दिली होती. धक्कादायक म्हणजे दुकान बंद होऊ नये म्हणून आरोपीने व्यावसायिकाकडून खंडणीची मागणी केली होती आणि त्यांच्याकडून ऑनलाईन 56 हजार रुपये घेतले होते. तसेच उर्वरित रक्कम लवकरच देण्यास सांगितले होते. तसेच व्यावसायिकाने सदर रक्कम दिली नाही तर त्यांची आणखीन बदनामी करण्याची धमकी दिली होती.

सदर घटनेनंतर व्यावसायिक प्रचंड घाबरले होते आणि त्यांनी मुलुंड पोलिसांना त्यांच्यासोबत घडलेला प्रकार सांगून संबंधित आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली होती. विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याचा तपास नंतर गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला. रविवारी सायंकाळी जेव्हा आरोपी खंडणीची उर्वरित रक्कम घेण्यासाठी मुलुंडच्या सोनापूर सिग्नलजवळ आला. त्यावेळी आधीपासून पाळत ठेवत असलेल्या गुन्हे शाखेच्या अधिर्कायांनी रणदिप गुजराल याला खंडणीची रक्कम घेताना अटक केली. त्याने घडलेल्या प्रकाराची कबुली देताना तक्रारदारांना शासकीय अधिकारी असल्याची बतावणी करून खंडणीसाठी धमकी दिल्याचे सांगितले. त्यानंतर त्याच्यावर अटकेची कारवाई करण्यात आली होती.

चौकशीत या गुन्ह्यात त्याच्या कुटुंबातील दोन सदस्यासह आफ्टरनून टाईम्सच्या एका कर्मचार्यायाचा सहभाग उघडकीस आला आहे. आरोपीकडून पोलिसांनी खंडणीची घेतलेली 2 लाख 85 हजाराची कॅश हस्तगत केली आहे. प्राथमिक तपासात ही टोळी सोशल मिडीयाच्या माध्यमातून व्यावसायिकासह व्यापार्यांना ब्लॅकमेल करून शासकीय अधिकारी असल्याची बतावणी करून खंडणी वसुली करत असल्याचे उघडकीस आले आहे. या टोळीने तक्रारदारासह इतर काही व्यापारी, व्यावसायिकांना खंडणीसाठी धमकी दिली आहे का? याचा पोलिसांकडून तपास सुरू आहे. रणदिप हा रिलस्टार असून त्याने सोशल मिडीयावर एक अकाऊंट उघडले होते. या अकाऊंटवरून त्याने बोगस व्हिडीओ व्हायरल करून तक्रारदार व्यापार्यायाला खंडणीसाठी धमकी दिली होती. अटकेनंतर त्याला सोमवारी (15 जून) किल्ला न्यायालयात हजर करण्यात आले होते. यावेळी न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी सुनावली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com